# आचारसंहिता



ही आचारसंहिता रिको ग्रुपसह संपूर्ण सेम्पेरिट समूहाला लागू होते.
आवृत्ती 8 – 12/2025 | ©2025 सेम्पेरिट बौद्धिक संपदा

## "महत्त्वाकांक्षा आणि कार्यक्षमता आम्हाला पुढे नेते - प्रामाणिकपणा आम्हाला सदैव योग्य मार्गावर ठेवतो."



२०० वर्षांहून अधिक काळ आम्ही उत्कृष्टता, नवकल्पना आणि लवचिकतेसाठी ओळखले जातो. आमचे यश फक्त तांत्रिक ज्ञान आणि चांगल्या दर्जाचे इलास्टोमर व सिलिकॉन उपाय यावर नाही, तर आम्ही काम करताना दाखवलेल्या प्रामाणिकपणावरही आहे.

व्यवसाय करताना आम्ही नीतिमत्ता आणि कायद्याच्या चौकटीवर आधारित राहून यश मिळवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असतो. आदर आणि विश्वास ही मूल्ये आमच्या सहकाऱ्यांशी, ग्राहकांशी, व्यवसाय भागीदारांशी आणि व्यापक सामाजिक घटकांशी असले-ल्या नात्यांची पायाभरणी करतात. आम्ही विश्वास ठेवतो, निर्माण करतो, मालकी स्वीकारतो आणि जबाबदारीने वितरित करतो. या मूल्यांचे दररोज पालन करणे म्हणजे प्रत्येक क्षणी उत्तरदायित्वाने वागणे.

आमची आचारसंहिता स्पष्ट नियम सांगते, योग्य निर्णय घेण्यास मदत करते आणि आम्ही स्वतःकडून तसेच आमच्या व्यवसाय भागीदारांकडून अपेक्षित असलेल्या नैतिक मूल्यांची ओळख करून देते. आचारसंहितेचे कोणतेही उल्लंघन आम्ही योग्य प्रकारे हाताळू आणि त्याचे पालन होत राहावे यासाठी आवश्यक पावले उचलू. ही आचारसंहिता आमच्या धोरणे आणि कामकाजासाठी आधार ठरते आणि उपलब्ध स्रोतांद्वारे अधिक तपशीलवार मार्गदर्शन देते.

आपले बोलणे, वागणे आणि कृती खूप महत्त्वाच्या असतात. काही गोष्ट योग्य वाटत नसेल तर आपण थांबतो, विचार करतो आणि सांगतो. चिंता मांडणे योग्य आहे – तुमचे मत ऐकले जाईल, गोपनीयता राखली जाईल आणि कोणताही प्रतिकार केला जाणार नाही.

ही आचारसंहिता आपल्याला कठीण परिस्थितीतही योग्य निर्णय घेण्यास मदत करते. योग्य गोष्ट करण्याच्या तुमच्या बांधिलकीब-द्दल धन्यवाद – सेम्पेरिटसाठी आणि आमच्यावर विश्वास ठेवणा-ऱ्या सर्वांसाठी!

कार्यकारी मंडळ
सेम्पेरिट एजी होल्डिंग



जेरफ्रीड एडर, मुख्य औद्योगिक अधिकारी, CIO | मॅनफ्रेड स्टॅनेक, CEO | हेल्मट सॉर्जर, CFO






## 01 आम्ही जे योग्य आहे ते करतो 6

आमची आचारसंहिता 9
आमची मूल्ये 14
आमच्या जबाबदाऱ्या 16
सचोटीने नेतृत्व करणे 18
व्यवसायासंबंधी विचारपूर्वक निर्णय घ्या 20
आपण नेहमी व्यक्त होतो 22

## 02 आपण विश्वास निर्माण करतो व मिळवतो 28

सचोटी आणि अनुपालन व्यवस्थापन प्रणाली 30
लाचखोरी आणि भ्रष्टाचाराला नकार 32
हितसंबंधांतील संघर्ष 36
व्यापार नियंत्रणे आणि निर्बंध 38
न्याय्य स्पर्धा 40
मनी लॉंडरिंग रोखणे 42



## 03 आम्ही सक्षम करतो आणि आदर करतो


| | |
|---|---|
| **03 आम्ही सक्षम करतो आणि आदर करतो** | 44 |
| मानवाधिकार | 46 |
| सामाजिक आणि कामगार मानके | 48 |
| पर्यावरण संरक्षण, आरोग्य आणि सुरक्षितता | 52 |
| एकमेकांचे आणि सामाजिक समुदायाचे रक्षण करणे | 54 |


## 04 जे मूल्यवान आहे त्याचे आम्ही रक्षण करतो


| | |
|---|---|
| **04 जे मूल्यवान आहे त्याचे आम्ही रक्षण करतो** | 56 |
| संवेदनशील माहिती | 58 |
| कृत्रिम बुद्धिमत्ता | 58 |
| डेटा संरक्षण आणि गोपनीयता | 59 |
| सायबर सुरक्षा | 59 |
| संवाद | 60 |
| अंतर्गत नियंत्रण नियम | 62 |

# 01 आम्ही जे योग्य आहे ते करतो





**सेम्पेरिटमध्ये योग्य गोष्ट करणे हे फक्त एक तत्त्व नसून, तर ते आमच्या ओळखीचा भाग आहे.**


मागील काही वर्षांत आम्ही दोन उच्च कार्यक्षम व्यवसाय युनिट्ससह एका केंद्रित औद्योगिक समूहात रूपांतरित झालो आहोत – सेम्पेरिट इंडस्ट्रियल अ◌ॅप्लिकेशन्स (SIA) आणि सेम्पेरिट इंजिनिअर्ड अ◌ॅप्लिकेशन्स (SEA) – जे नावीन्य आणि जागतिक स्पर्धात्मकतेला चालना देतात.

आमचे यश केवळ परफॉर्मन्सवर नाही तर विश्वास, प्रामाणिकपणा आणि नैतिक वर्तनावरही आधारित आहे. आजच्या आपल्या निवडी भविष्याची काळजी, हवामानाची जबाबदारी, समता आणि दीर्घकालीन टिकाव या गोष्टींनी प्रभावित आणि मार्गदर्शित होत आहेत.

आम्ही विश्वास, लवचिकता आणि साध्या कल्पकतेसाठी ओळखले जातो. आम्ही रबरावर काम करतो – ती आमच्यासाठी फक्त  एक वस्तू नाही, तर ती आमची विचारधारा आहे. आम्ही जबाबदारीचे ओझे सहन करतो, पुन्हा उभे राहतो आणि मार्ग शोधतो. आम्ही उद्योग चालू ठेवतो आणि जगाला वेग देतो.

**आम्ही योग्य तेच करतो.**





# आमची आचारसंहिता

ही आचारसंहिता आपली मार्गदर्शक आहे. ती आपल्याला कामाच्या ठिकाणी कसे वागावे याची दिशा देते आणि आपल्याला रोज योग्य निर्णय घेण्यास मदत करते. आम्ही कायद्याचे पालन आणि व्यावसायिक नीतिमत्तेच्या उच्च मानकांचे अनुसरण करण्यास ठामपणे बांधील आहोत. आमची मूल्ये आम्ही कोणत्या तत्त्वांना साथ देतो आणि व्यवसाय कसा करतो याची सतत आठवण करून देतात.

आमची आचारसंहिता समूहासाठी स्पष्ट तत्त्वे, मानके आणि नैतिक अपेक्षा सांगते आणि आम्हाला धोरणे, मार्गदर्शक तत्त्वे आणि सूचनांच्या चौकटीशी जोडते. ती काय योग्य आहे, काय अयोग्य आहे आणि विविध परिस्थितीत कसे वागावे हे ओळखण्यात मदत करते.

आपल्यला जरी योग्य मार्ग लगेच दिसत नसला तरी ती आपल्याला आत्मविश्वासाने, प्रामाणिकपणे आणि सामान्य व्यवहारज्ञान वापरून वागण्यास सक्षम करते,
सेम्पेरिटमध्ये आणि बाह्य व्यवसाय वातावरणात लागू होणाऱ्या सर्व नियमांचे पालन करण्याची जबाबदारी प्रत्येकावर आहे.

ही आचारसंहिता नैतिक निर्णय घेण्यासाठी स्पष्ट दिशा आणि मजबूत पाया देते. आम्ही सचोटीने काम करतो आणि आमच्या व्यवसाय भागीदारांकडूनही अशाच उच्च मानकांचे पालन आणि नैतिक व्यवसायाची अपेक्षा करतो.

**“कधी तुम्हाला एखाद्या वेळी खात्री वाटत नसेल, तर थांबा, विचार करा आणि आमच्या-कडे मार्गदर्शन मागा.”**

# आपल्याकडे आचारसंहिता का आहे?



आपली आचारसंहिता केवळ नियमांच्या संचाहून अधिक बरेच काही आहे: आपल्या सर्वांना अभिमान वाटेल अशा संस्कृतीचा तो पाया आहे. कितीही लहान असली, तरी प्रत्येक कृती सेम्पेरिटच्या लौकिकाला आणि दीर्घकालीन यशाला हातभार लावते याचे स्मरण.

आपण जे काही करतो त्याच्या केंद्रस्थानी आदर असतो – एकमेकांबद्दल, आपल्या व्यवसाय भागीदारांबद्दल, समुदायाबद्दल आणि पर्यावरणाबद्दल. आम्ही असे कार्यस्थळ तयार करतो, जिथे प्रत्येकाला महत्त्व असल्यासारखे, समावेशक आणि कल्पना किंवा चिंता शेअर करण्यासाठी पुरेसे सुरक्षित वाटेल. अशा प्रकारे आपण विश्वास निर्माण करतो, सहकार्य जोपासतो आणि स्वतःला जबाबदार धरतो.

आजच्या गतिमान जगात, तुम्हाला अनेकदा नवीन आणि गुंतागुंतीच्या नैतिक दुविधांना तोंड द्यावे लागू शकते. योग्य निर्णय घेणे नेहमीच सोपे नसते. आचारसंहिता तुमच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देऊ शकत नसली, तरी ती तुम्हाला योग्य दिशेने मार्गदर्शन करण्यासाठी आणि मदत करण्यास सक्षम असलेल्या स्रोतांशी आणि लोकांशी जोडण्यासाठी नेहमीच सज्ज असेल. तसेच एखादी गोष्ट योग्य वाटत नाही, तेव्हा तुमच्या नैतिक निकषांचे अनुसरण करा. कोणतीही संहिता तुमच्या स्वतःच्या निर्णयाला पर्याय म्हणून काम करू शकत नाही. थोडे थांबा, प्रश्न विचारा आणि व्यक्त व्हा, ज्यामुळे तुम्हाला तुमच्या मार्गातील प्रत्येक पावलावर पाठिंबा मिळणार असल्याच्या खात्रीने सुरक्षित वाटेल.

लक्षात ठेवा: स्थानिक रिवाज किंवा व्यवसाय पद्धती आमच्या मानकांशी जुळत नसल्यास, आमच्या आचारसंहितेचे पालन करा. स्थानिक कायदा आमच्या आचारसंहितेशी विसंगत असल्यास, कायद्याचे पालन करा. तुम्हाला अजूनही खात्री नसल्यास, तुमच्या टीम लीडला, People&Culture किंवा पालन यांमधील आमच्या सहकाऱ्यांना मदतीसाठी विचारा.

अखेरीस, आचारसंहिता ही आमची मूल्ये प्रत्यक्षात आणण्याची, निष्पक्ष स्पर्धा करण्याची आणि सेम्पेरिट ही एक जबाबदार, नैतिक आणि शाश्वत कंपनी राहण्याची खात्री करण्यासाठीची आमची सामायिक वचनबद्धता आहे, ज्याचा भाग असल्याचा आम्हाला सर्वांना अभिमान आहे – आज आणि भविष्यातही.

**चला, एकत्र मिळून ते साध्य करू या!**





## ही आचारसंहिता तुम्हाला पुढील गोष्टींमध्ये मदत करते...

- प्रामाणिकपणे आणि सचोटीने काम करणे.
- आपल्या मूल्यांनुसार वागणे आणि आपल्या लौकिकाचे रक्षण करणे.
- सेम्पेरिट तुमच्याकडून काय अपेक्षा ठेवते हे समजून घेणे.
- दररोज योग्य आणि विचारपूर्वक निर्णय घेणे.
- आपल्या कामाला लागू असलेल्या कायदे, नियम आणि मानकांचे पालन करणे.
- मदत किंवा मार्गदर्शन कुठून मिळेल हे ओळखणे.

# ही आचारसंहिता कोणाला लागू होते?

सेम्पेरिटमधील सर्वांसाठी ही आचारसंहिता आहे. बोर्ड सदस्य, संचालक, कर्मचारी, आकस्मिक कामगार, कंत्राटी कामगार आणि आमच्या वतीने काम करणारे सर्व लोक यांना ती लागू होते.

ती जगभरातील प्रत्येक सेम्पेरिट उपकंपनीला लागू होते, तसेच ज्या संस्थांमध्ये आमचे बहुसंख्य हितसंबंध आहेत किंवा जिथे आम्ही ऑपरेशन चालवतो त्या सर्वांनाही लागू होते.

आपण जिथे एकत्र काम करतो, तिथे या आचारसंहितेचे पालन करणे ही आपल्या सर्वांची समान जबाबदारी, अपेक्षा आणि वचनबद्धता आहे.

सर्व स्तरांवरील टीम लीड आणि व्यवस्थापकांनी सचोटीने नेतृत्व करावे आणि आमच्या कर्मचाऱ्यांना योग्य मार्गदर्शन आणि सपोर्ट द्यावा.

## आमच्या व्यवसाय भागीदारांबद्दल काय नियम आहेत?

आम्ही अपेक्षा ठेवतो की आमचे पुरवठादार, विक्रेते आणि इतर तृतीय पक्ष व्यवसाय भागीदार प्रामाणिकपणा आणि नैतिक वर्तनाची समान उच्च मानके पाळतील आणि आमच्या आचारसंहितेत दिलेल्या तत्त्वांचे पालन करतील.

आमच्या भागीदारांसाठीच्या खास आवश्यकता आमच्या गट पुरवठादार धोरणात स्पष्टपणे दिल्या आहेत आणि आमच्या करारांमध्ये त्या लक्षात घेणे आवश्यक आहे.

# एखाद्या व्यक्तीने आचारसंहितेचे उल्लंघन केल्यास काय होते?

विश्वास मिळवणे कठीण असते आणि तो गमावणे खूप सोपे असते. एखादी व्यक्ती आमची आचारसंहिता, आमची धोरणे किंवा कायदा तोडते, तेव्हा त्याचा परिणाम फक्त त्या व्यक्तीवर नाही, तर आपल्या सर्वांवर होतो. त्यामुळे आमच्या भागधारकांचा आमच्यावरचा विश्वास कमी होतो आणि सेम्पेरिटच्या लौकिकाला मोठी हानी होऊ शकते.

आचारसंहितेचे उल्लंघन झाल्यास आम्ही त्वरित कारवाई करतो. भविष्यात पुन्हा उल्लंघन होऊ नये आणि झालेली हानी भरून निघावी यासाठी आम्ही प्रयत्न करतो.

आमच्या कर्मचाऱ्यांसाठी, याचा अर्थ असा की उल्लंघनांमुळे शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते, ज्यात नोकरीवरून काढून टाकणेही येते. आमच्या भागधारकांसाठी, याचा अर्थ असा की आम्ही व्यावसायिक संबंध संपवू शकतो आणि नुकसानभरपाई मागू शकतो. परिस्थितीनुसार, उल्लंघनांमुळे संबंधित व्यक्ती आणि कंपनी म्हणून सेम्पेरिट यांना दिवाणी किंवा फौजदारी कारवाईला सामोरे जावे लागू शकते.

# आपली मूल्ये

**वेगाने बदलणाऱ्या आणि स्पर्धा-त्मक जगात, आपल्या मूल्यांशी प्रामाणिक राहणे खूप महत्त्वाचे आहे.**

आपण ही मूल्ये आपल्या दैनंदिन कामात वापरतो आणि सेम्पेरिट ब्रँड नेहमी नैतिक व्यावसायिक वर्त-नासाठी उभा आहे हे दाखवतो.



## मूल्यांचे अपेक्षित वर्तनात रूपांतर करणारी सेम्पेरिट मूल्ये




**अधिक जाणून घ्या**

सेम्पेरिट मूल्ये

# आमच्या जबाबदाऱ्या

## माझी वैयक्तिक जबाबदारी काय आहे?

**दर दिवशी आणि प्रत्येक निर्णयात तुमची सर्वोत्तम क्षमता वापरा.**
नैतिक आव्हानांमधून पुढे जा आणि गोष्टी गुंतागुंतीच्या किंवा अनिश्चित झाल्या तरीही तुम्ही सचोटीने वागत आहात आणि आमच्या मूल्यांशी निष्ठा ठेवत आहात याची खात्री करा.


आमची आचारसंहिता जाणून घ्या आणि त्यानुसार जगा
तुमच्या कामाला लागू होणारे कायदे, नियम, अंतर्गत धोरणे आणि मार्गदर्शक तत्त्वे पूर्णपणे वाचा आणि त्यांचे पालन करा. तुमच्या कामासाठी काय आवश्यक आहे आणि काम पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या विविध टूलचा वापर कसा करायचा हे समजून घ्या. तुम्हाला दिलेले सर्व प्रशिक्षण पूर्ण करा, कारण ज्ञान वाढवण्याचा आणि अधिक शिकण्याचा हा सर्वोत्तम मार्ग आहे.

**नैतिक निर्णय घेऊन विश्वास संपादन करा**
जबाबदार व्यावसायिक वर्तनासाठी वचनबद्ध रहा. तुम्ही जे काही करता, त्यात नेहमी प्रामाणिकपणा, निष्पक्षता आणि सचोटीने कृती करा. कोणताही अपवाद नाही. ऐका, थांबा, विचार करा आणि व्यक्त व्हा किंवा सल्ला मागा. योग्य व्यवसाय वर्तनाबद्दल तुमच्या टीम लीडला किंवा पालन विभागाला विचारा.

**एकमेकांचा, आपल्या कंपनीचा आणि पर्यावरणाचा आदर करा.**
छळ किंवा भेदभाव न करता, सर्वांना सन्मानाने वागवा. आपल्या भोवतालचे लोकं, आपली पृथ्वी यांचा विचार करा आणि संभाव्य दीर्घकालीन परिणाम विचारात घ्या. मानवाधिकार, आमची मालमत्ता, पर्यावरण, गोपनीयता, खाजगीपणा आणि माहिती यांचे संरक्षण करा.

**कृती करण्यापूर्वी विचार करा**
उत्तम विचारशक्ती वापरा आणि प्रश्न विचारा. तुमच्या कृतींची जबाबदारी घ्या. यशाच्या दबावामुळे तुम्ही चुकीचे काम करू नका. लक्षात ठेवा: कोणीही तुम्हाला कायदा तोडायला किंवा आमच्या नियमांकडे दुर्लक्ष करायला सांगू शकत नाही. तुमच्या पदाचा किंवा कंपनीच्या वस्तूंचा कधीही गैरवापर करू नका किंवा त्यांचा वैयक्तिक फायद्यासाठी वापर करू नका.

**नेहमी व्यक्त व्हा**
तुम्हाला कधी शंका वाटल्यास किंवा काही चुकीचे दिसल्यास, नेहमी बोला आणि मदत मागा. प्रतिशोधाची भीती न ठेवता प्रश्न विचारा किंवा चिंता सांगा. चुकीकडे कधीही दुर्लक्ष करू नका. तुम्हाला गैरवर्तन किंवा अनैतिक वागणुकीचा संशय आल्यास किंवा तुम्ही ते पाहिल्यास, नेहमी बोला!





## माझा टीम लीडने मला आपल्या आचारसंहितेचे किंवा कायद्याचे उल्लंघन होईल असे काही करण्यास सांगितल्यास...

- तुमच्या टीम लीडसमोर तुमच्या चिंता स्पष्टपणे आणि प्रामाणिकपणे सांगा.
- गरज पडल्यास मदत मागा. प्रतिसाद योग्य वाटत नसेल किंवा तुम्हाला अस्वस्थ वाटत असेल, तर दुसरे स्पीक अप साधन (SemperLine) वापरा.
- टीम लीडने तसे सांगितले असले, किंवा तुम्ही मदत मागितली नसल्यामुळे, आचारसंहिता, नियम किंवा कायदा यांचे जाणूनबुजून कधीही उल्लंघन करू नका.



# सचोटीने नेतृत्व करणे

## टीम लीड म्हणून, त्याव्यतिरिक्त माझ्याकडून काय अपेक्षा आहेत?

सेम्पेरिटमधील प्रत्येक कर्मचाऱ्याकडून सचोटीने काम करण्याची अपेक्षा असते, पण टीम लीड आणि व्यवस्थापकांवर आणखी मोठी जबाबदारी असते: उदाहरण देऊन नेतृत्व करण्याची. टीम लीड म्हणून, तुम्ही सेम्पेरिट लीडरशिप ऑपरेटिंग सिस्टीमचे पालन केले पाहिजे आणि ती प्रत्यक्षात लागू केली पाहिजे.

### उदाहरणाद्वारे नेतृत्व करा

तुम्ही सेम्पेरिटची संस्कृती घडवता; तुम्हीच वातावरण तयार करता. तुम्ही काय बोलता यापुरतेच नाही, तर तुम्ही रोज कशी कृती करता यामध्येदेखील पालन करणारे आणि नैतिक निर्णय घेणारे आदर्श बना.

### मानक निश्चित करा

तुमच्या टीमला स्पष्ट सांगा की यश हे नैतिक वर्तनातून आणि आमच्या आचारसंहिता व कायद्यांचे पूर्ण पालन करूनच मिळते. योग्य पद्धतीने व्यवसाय करण्याबद्दल नियमितपणे खुले संवाद घडवा आणि त्यासाठी वेळ ठेवा.

### सुरक्षित जागा तयार करा

असे वातावरण तयार करा, ज्यामध्ये प्रत्येकाला सुरक्षित, मोकळे आणि आत्मविश्वासपूर्ण वाटेल आणि ते प्रतिशोधाची भीती न बाळगता तुमच्याकडे प्रश्न आणि चिंता घेऊन येतील.

### ऐका आणि पाठिंबा द्या

ऐका, विचार करा आणि प्रतिसाद द्या. कोणत्याही प्रश्नांना किंवा चिंतांना उत्तरे देण्याचा प्रयत्न करा. तुम्हाला मदत हवी असल्यास, संबंधित विभागांशी किंवा पालनाशी संपर्क साधा.

### विनाविलंब कृती करा

पालन न करणारे कोणतेही वर्तन लगेच हाताळा. तुमच्याकडे आलेल्या कोणत्याही चिंता नोंदवा आणि त्या समूह पालन विभागाकडे किंवा स्थानिक पालन समन्वयकाकडे पाठवा.

### प्रतिशोध रोखा

चिंता व्यक्त करणाऱ्यांविरुद्ध प्रतिशोध घेऊ नका. त्यांचे संरक्षण होत असल्याची खात्री करा!

### रिवॉर्ड

सचोटी स्वीकारा आणि तिचा परफॉर्मन्सच्या उद्दिष्टांमध्ये समावेश करा

**अधिक जाणून घ्या**

सेम्पेरिट लीडरशिप ऑपरेटिंग सिस्टीम

# व्यवसायासंबंधी विवेकपूर्ण निर्णय घ्या

आपण घेतलेला प्रत्येक निर्णय आपल्यावर, आपल्या भागधारकांवर आणि आपल्या व्यवसायावर परिणाम करू शकतो. बहुतांश वेळा, आमची आचारसंहिता पाळणे सोपे असते. परिस्थिती स्पष्ट असते आणि योग्य निर्णयही स्पष्ट असतो. पण काही वेळा, आपण अशा परिस्थितीत येतो, जिथे पुढे कसे जावे हे फारसे स्पष्ट नसते.

**“तुम्ही घेतलेल्या प्रत्येक निर्णयात, तुम्ही सर्वोत्तम विचारशक्ती वापरावी आणि कायदे व अंतर्गत नियम पाळावेत, यासाठी आम्ही तुमच्यावर विश्वास ठेवतो.”**

काही वेळा असे येतात, जेव्हा तुम्ही दबावात असता किंवा काय करावे याची तुम्हाला खात्री नसते. तुम्हाला कठीण निर्णय घ्यावा लागतो, तेव्हा नेहमी लक्षात ठेवा की तुम्ही एकटे नसता. आम्ही ऐकण्यासाठी तयार असतो. कृती करण्यापूर्वी, स्वतःला विचारा...



### तयारी करा

चांगले निर्णय घेण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी तुमच्याकडे असल्याची खात्री करा.

- चांगला निर्णय घेण्यासाठी आवश्यक असलेली सर्व तथ्ये तुमच्याकडे आहेत का? हा निर्णय सर्वोत्तम आहे किंवा नाही याबद्दल तुम्हाला खात्री नसल्यास, तुमच्या माहितीच्या आधाराबाबत विचार करा.
- तुम्हाला निर्णय घेताना सोयीस्कर वाटते का?
- तुमचा आतला आवाज तुमच्या निर्णयाशी सुसंगत आहे का?
- तुम्हाला पश्चात्ताप होईल का?



### थांबा आणि विचार करा

घाईने निर्णय घेऊ नका.

- निर्णय घेण्यासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती तुमच्याकडे आहे का?
- तुमचा निर्णय कायदेशीर आहे का?
- ते आपल्या मूल्यांशी आणि आचारसंहितेशी सुसंगत आहे का?
- तुम्हाला हा निर्णय घेण्याचा अधिकार आहे का?
- तुमच्या कृतींचे परिणाम काय होतील?
- या निर्णयाचा काय परिणाम होईल?
- तुम्हाला ते करायला भाग पाडले जात आहे का?



### विचारा आणि व्यक्त व्हा!

काय करावे याबद्दल अजूनही शंका आहे का? विचारा!

तुम्ही तुमचा आतला आवाज ऐकला आहे, तुम्ही थांबलात आणि त्यावर विचार केला आहे. अजूनही गोंधळात आहात का? विचारा आणि बोला, तुमच्या चिंता सांगा आणि तुमचे टीम लीड, समूह पालन विभाग किंवा तुमचा स्थानिक पालन समन्वयक यांच्याकडून सल्ला घ्या, जे तुम्हाला योग्य निर्णय घेण्यात मदत करतील.

# कृती करण्यापूर्वी स्वतःला विचारा

- मी सर्व तथ्ये तपासली आहेत का?
- ते लागू कायद्यांचे आणि नियमनांचे पालन करते का?
- ते सेम्पेरिटच्या मूल्यांशी, आचारसंहितेशी आणि धोरणांशी सुसंगत आहे का?
- ते आमच्या भागधारकांप्रती असलेली आमची वचनबद्धता दर्शवते का?
- मला निर्णय घेण्याचा अधिकार आहे का?
- या निर्णयामुळे मला किंवा कंपनीला हानी पोहोचू शकते का?
- इतरांना काय वाटेल?



# आपण नेहमी व्यक्त होतो

सेम्पेरिट येथे, प्रश्न विचारताना किंवा चिंता सांगताना तुम्हाला पूर्ण मोकळेपणा, आत्मविश्वास आणि सुरक्षितता वाटावी अशी आमची इच्छा आहे




- काय करावे याबद्दल तुम्हाला खात्री नसल्यास
- एखादी गोष्ट योग्य वाटत नसल्यास, किंवा
- तुम्हाला काही गोष्ट असुरक्षित, बेकायदेशीर, अनैतिक किंवा संभाव्यतः हानिकारक वाटल्यास — ती तुमच्यासाठी, सहकाऱ्यांसाठी, व्यवसाय भागीदारांसाठी किंवा आपल्या कंपनीसाठी असो — कृपया ती लगेच व्यक्त करा.

### तुमच्या मतामुळे हानी रोखली जाते.

तुम्हाला काय करावे याची खात्री नसेल, तुम्ही चूक केली असेल असे वाटत असेल किंवा चुकीच्या वाटणाऱ्या गोष्टीत तुम्ही सहभागी झाला असाल, तर आम्ही तुम्हाला पुढे यायला प्रोत्साहन देतो. कोणतीही अडचण लवकर लक्षात आली, तर आपण ती लवकर सोडवू शकतो, तिचे परिणाम कमी करू शकतो, उपाय शोधू शकतो आणि अशा घटना पुन्हा होऊ नयेत यासाठी पावले उचलू शकतो. असे केल्याने आपण एकमेकांचे, आपल्या कंपनीचे आणि आपल्या लौकिकाचे रक्षण करू शकतो.

### तुम्हाला एखादी गोष्ट दिसताच काहीतरी बोला

तुम्हाला काय करावे हे माहित नसेल किंवा आमच्या आचारसंहिता, अंतर्गत नियम किंवा कायद्याचे उल्लंघन होऊ शकणारे वर्तन दिसले, जरी खरोखर उल्लंघन झाले आहे की नाही याची खात्री नसली तरीही, तुम्ही लगेच बोलावे अशी आमची अपेक्षा आहे.

### चिंता व्यक्त करणे हे एक कर्तव्य आहे, निवड नाही.

जर तुम्हाला असुरक्षित वाटत असेल किंवा आमच्या नियमांचे किंवा कायद्याचे उल्लंघन करून कृती करण्यास दबाव येत असेल तर कृपया संकोच न करता संपर्क साधा.

### एकत्रितपणे आपण संरक्षण करतो: व्यक्त व्हा, तुमचे मत पोहोचवा

बोलणे म्हणजे केवळ गंभीर नियमभंगाची तक्रार करणे इतकेच नाही; ते मोकळेपणा आणि विश्वासाची संस्कृती घडवण्याबद्दल असते. तुम्ही नियमांबाबत मुद्दा मांडत असलात, कामातील अडचण शेअर करत असलात किंवा फक्त प्रश्न विचारत असलात, तरीही: तुमचे मत महत्त्वाचे आहे.

सेम्पेरिटमध्ये, आम्ही प्रत्येक मत – ते कितीही मोठे किंवा लहान असो – आदराने, न्यायाने आणि योग्य पद्धतीने हाताळण्याचे वचन देतो.

**“आम्हाला समजते, की व्यक्त होणे नेहमीच सोपे नसते. काही वेळा प्रश्न विचारण्यासाठी किंवा चिंता व्यक्त करण्यासाठी धाडस लागते, परंतु असे केल्याने आमच्या टीममध्ये, आमच्या कंपनीमध्ये आणि आमच्या भागीदारांमध्ये विश्वास निर्माण होतो.”**



## चिंता व्यक्त करण्यासाठी मी कसे बोलावे?

तुम्हाला गैरवर्तनाची तक्रार करायची असल्यास, चिंता व्यक्त करायची असल्यास किंवा प्रश्न विचारायचा असल्यास – आणि नियमित संवाद माध्यमे (तुमचा टीम लीड अथवा People&Culture) वापरायची नसल्यास, तर तुम्ही यांद्वारे थेट बोलू शकता:

**SemperLine – हॉटलाइन**: आमचे सुरक्षित, गोपनीय वेब पोर्टल आमच्या कर्मचाऱ्यांसाठी आणि बाह्य पक्षांसाठी कोणत्याही वेळी आणि विविध भाषांमध्ये उपलब्ध आहे.

**सेम्परबॉक्स** – आम्हाला पत्र पाठवा: तुमच्या उत्पादन साइटवरील नियुक्त पोस्टबॉक्समध्ये एखादे निनावी पत्र सुरक्षितपणे टाका.

**किंवा तुम्ही आम्हाला ईमेल करू शकता, भेट देऊ शकता अथवा कॉल करू शकता:** compliance@semperitgroup.com



# काहीतरी चुकीचे आहे का? काहीतरी बोला. आम्ही ऐकण्यासाठी येथे आहोत!

अनियमितता किंवा उल्लंघने त्वरित ओळखणे आणि त्याबद्दल बोलणे ही प्रत्येकाची स्वतःची जबाबदारी आहे. तुम्ही प्रश्न विचार-ल्यास किंवा चिंता व्यक्त केल्यास गैरवर्तन थांबवण्यास मदत होते. समस्येचा परिणाम तुमच्यावर, इतरांवर किंवा कंपनीवर होत असला, तरीही तुम्हाला कोणतेही मार्ग निवडण्याचे स्वातंत्र्य आहे.

### तुमच्या टीम लीडशी बोला.

तुमचे टीम लीड तुम्हाला मार्ग दाखवण्यासाठी येथे असतात. त्यांना व्यवसाय आणि तुमच्या कामाचे नियम समजतात. तुम्ही दुविधेत असाल किंवा स्पष्टता हवी असेल, तरी तेच तुमचे पहिले साहाय्यक असतात.

### People&Culture शी संपर्क साधा

मूल्ये आणि वर्तन यांपासून छळ, त्रास, भेदभाव आणि अशा अनेक विषयांवरील नियमांपर्यंत, कामाच्या ठिकाणाशी संबंधित प्रश्न व चिंता मांडण्यासाठी लोक व संस्कृती विभाग हा तुमचा विश्वासार्ह मार्ग आहे. सहभागी प्रत्येकासाठी ते आदरपूर्ण आणि न्याय्य वातावरण तयार करण्यास मदत करतात.

### प्रश्न विचारा किंवा पालन टीमशी बोला.

समूह पालन विभाग किंवा तुमचे स्थानिक पालन समन्वयक हे नियम आणि नैतिक व्यवसाय पद्धतींबाबत मार्गदर्शन करू शकतात. ते टीम लीड, व्यवस्थापक, मानव संसाधन किंवा इतर विभागांसह, कोणत्याही मार्गाने तुम्ही मांडलेल्या चिंता स्वीकारतात आणि त्यांची गोपनीयरीत्या चौकशी करतात.

#### अधिक जाणून घ्या

व्यक्त व्हा!

SemperLine

व्यक्त होण्यासंबंधी धोरण

स्थानिक पालन समन्वयक

समूह पालन विभाग

# तक्रार केलेल्या चिंता गांभीर्याने घेतल्या जातात

तुम्ही कायद्यांच्या, आमच्या आचारसंहितेच्या किंवा अंतर्गत धोरणांच्या संशयास्पद उल्लंघनांची तक्रार करू शकता (व्यक्त व्हा! वारंवार विचारले जाणारे प्रश्न पहा). काय घडले, कोण सहभागी होते आणि कधी, कुठे व कसे घडले याचे वर्णन करा आणि संबद्ध दस्तऐवज जोडा. माहिती गोळा करण्यासाठी तुमची सुरक्षितता धोक्यात आणू नका, कोणतेही नियम किंवा कायदे मोडू नका.

### मला कशाची आणि कशी तक्रार करता येईल?

तुम्ही कायद्यांच्या, आमच्या आचारसंहितेच्या किंवा अंतर्गत धोरणांच्या संशयास्पद उल्लंघनांची तक्रार करू शकता (व्यक्त व्हा! वारंवार विचारले जाणारे प्रश्न पहा). काय घडले, कोण सहभागी होते आणि कधी, कुठे व कसे घडले याचे वर्णन करा आणि संबद्ध दस्तऐवज जोडा. माहिती गोळा करण्यासाठी तुमची सुरक्षितता धोक्यात आणू नका, कोणतेही नियम किंवा कायदे मोडू नका.

### मी माझी तक्रार केल्यानंतर काय होते?

सर्व संबद्ध माहिती मिळवण्यासाठी त्यावर पुढील प्रक्रिया करता येईल का हे ठरवण्याकरिता पालन टीम प्रत्येक तक्रारीचे पुनरावलोकन करेल. तुमचे नाव देऊन किंवा SemperLine पोस्टबॉक्सद्वारे निनावीपणे संपर्कात राहण्यास तुम्हाला प्रोत्साहन दिले जाते. समूह पालन हा विषय पालन मंडळासमोर मांडेल, पुढील पावलांबाबत सल्ला देईल आणि तपासाचे परिणाम शेअर करेल आणि असे करताना नेहमी गोपनीयता राखण्याची खात्री करेल. सहभागी असलेल्या सर्वांनी पूर्णपणे आणि प्रामाणिकपणे सहकार्य करावे अशी अपेक्षा आहे. पुष्टी झालेल्या उल्लंघनाच्या बाबतीत, सेम्पेरिट लागू कायद्यांनुसार कारवाई करेल.

### ज्या गोष्टींची मला खात्री नाही त्यांची मला तक्रार करता येईल का?

पुढे येण्यापूर्वी, तुम्ही पाहिलेल्या तथ्यांची किंवा तुमच्या निरीक्षणांची पडताळणी करणे तुम्हाला कोणत्याही प्रकारे बंधनकारक नाही. मात्र, कृपया लक्षात ठेवा, की तुमची तक्रार महत्त्वाच्या निर्णयांवर प्रभाव टाकू शकते आणि सहभागी व्यक्तींवर परिणाम करू शकते, म्हणून ती अचूक असणे आवश्यक आहे. तुम्ही ज्या तथ्यांची तक्रार केली आहे ती केवळ ऐकीव असल्यास किंवा संशय काहीसा अस्पष्ट असल्यास, तुम्ही त्यानुसार हे सूचित केले पाहिजे. जाणूनबुजून खोटे आरोप करणे, तपासांदरम्यान खोटे बोलणे किंवा दिशाभूल करणारी, खोटी अथवा बेकायदेशीर माहिती सादर करणे याला सक्त मनाई आहे आणि त्यामुळे शिस्तभंगाचे किंवा कायदेशीर परिणामदेखील होऊ शकतात.

### मला निनावी तक्रार करता येईल का?

जिथे कायद्याने परवानगी दिली आहे तिथे, सेम्पेरिट तुम्हाला निनावी तक्रार करण्याची अनुमती देते. निनावी तक्रारी स्वीकारल्या जातात, परंतु अत्यावश्यक माहिती उपलब्ध नसल्यास, त्यांचा पूर्णपणे तपास करता येत नाही.

### गोपनीयता राखली जाते का?

नक्कीच. सर्व तक्रारी काळजीपूर्वक हाताळल्या जातात आणि गोपनीयता, व्यावसायिकता, स्वातंत्र्य व निष्पक्षता या तत्त्वांचे पालन केले जाते.

#### अधिक जाणून घ्या

व्यक्त व्हा!

SemperLine

व्यक्त होण्यासंबंधी धोरण

तपास मॅन्युअल



## प्रतिशोध घेण्यास सक्त मनाई आहे

प्रत्येकाला भय न बाळगता व्यक्त होणे सुरक्षित वाटले पाहिजे. सद्भावनेने व्यक्त होणाऱ्या आणि चिंता व्यक्त करणाऱ्या किंवा तपासात सहभागी होणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कोणत्याही प्रकारची नकारात्मक कारवाई आम्ही सहन करत नाही, ती चिंता निराधार असल्याचे दिसून आले तरीही.

येथे प्रतिशोध घेण्यामध्ये नोकरीवरून काढून टाकणे, पदावनती करणे, अन्याय्य नकारात्मक मूल्यांकने, मीटिंगमधून वगळणे, तोंडी किंवा इतर कोणतेही गैरवर्तन, धमक्या अथवा कोणत्याही प्रकारची शिक्षा यांचा समावेश असू शकतो.

तुम्हाला प्रतिशोधाचा अनुभव आल्यास, कृपया compliance@semperitgroup.com येथे संपर्क साधा किंवा SemperLine द्वारे तक्रार करा.

आम्ही प्रतिशोधाच्या किंवा गैरवर्तनाच्या सर्व विश्वासार्ह आरोपांचा सखोल तपास करतो. आमच्या कंपनीत प्रति शोधायचे कोणतेही कृत्य सिद्ध झाल्यास, जबाबदार असलेल्या व्यक्तींविरुद्ध निर्णायक आणि कठोर कारवाई केली जाईल.

# 02 आपण विश्वास निर्माण करतो आणि मिळवतो





वाढत्या आर्थिक, नियमांशी संबंधित, सामाजिक आणि नैतिक गरजा – तसेच भागधारकांच्या वाढत्या अपेक्षा – लक्षात घेता, आपण जागतिक स्तरावर कसे काम करतो यासाठी सचोटी आणि नियमांचे पालन आवश्यक झाले आहे.

आमच्या टिकावधर्म धोरणाचा भाग म्हणून, ही तत्त्वे केवळ औपचारिकता न राहता त्यापेक्षा खूप महत्त्वाची ठरली आहेत – सुशासन राखताना, आमचे कर्मचारी, पुरवठादार, ग्राहक, व्यवसाय भागीदार आणि भागधारक यांच्यासोबत विश्वास निर्माण करण्यासाठी आणि तो टिकवण्यासाठी ही तत्त्वे आधार ठरली आहेत.

**“विश्वास मिळवण्यासाठी, जबाबदारीने नेतृत्व करण्यासाठी आणि लोकांचा विश्वास असलेल्या व्यवसायाला आकार देण्यासाठी आम्ही सचोटीला रोजच्या वागणु-कीत मानतो आणि पाठिंबा देतो.”**

# शिस्त पाळून विश्वास निर्माण करा

मजबूत जागतिक एकात्मता आणि पालन व्यवस्था आम्हाला कंपनीत, तसेच व्यावसायिक भागीदार आणि भागधारकांमध्ये विश्वास निर्माण करायला आणि तो टिकवायला मदत करते.

## मोठ्या धोक्यांतून मार्ग काढा

एकात्मिक चौकट असलेला ठाम दृष्टिकोन आम्हाला बेकायदेशीर किंवा अनैतिक वर्तन ओळखायला, थांबवायला, धोके हाताळायला, तक्रारींची चौकशी करायला आणि समस्यांचे परिणाम समजून घ्यायला मदत करतो. तीन मुख्य आधारांवर ही चौकट शब्दांना कृतीत आणि कृतीला बदलात रूपांतरित करते.



### रोखा

आमची टीम सुरुवातीलाच धोके ओळखण्यावर भर देते. नियमांबद्दल सतत शिकणे आणि नियमित प्रशिक्षण सत्रे सर्वांना धोके ओळखायला आणि टाळायला मदत करतात. रोखणे म्हणजे आचारसंहिता, नियम, मार्गदर्शक तत्त्वे, प्रक्रिया आणि नियंत्रण यांचा रोजच्या कामात वापर.



### ओळखा

आम्ही खुले संवाद साधतो, चिंता व्यक्त करतो, भागीदार तपासतो, माहितीचे विश्लेषण करतो, देखरेख, पुनरावलोकन आणि लेखापरीक्षण करतो. त्यामुळे आम्ही धोके आणि अडचणी ओळखतो. तुम्हाला काही शंका वाटल्यास, नक्की बोला!




### उपाय करा

समस्या आल्या की आम्ही लगेच कृती करतो. आम्ही चिंता तपासतो, उपाय सुचवतो, अंमलात आणतो आणि धोके कमी करण्यासाठी सुधारणा करतो. त्यामुळे कंपनी, कर्मचारी आणि भागीदार सुरक्षित राहतात.

पालन हे पारदर्शकता आणि जबाबदारी वाढवते, चांगले निर्णय घेण्यास मदत करते आणि संस्थेच्या आत आणि बाहेर आदरयुक्त, प्रामाणिक संवाद घडवते.

**अधिक जाणून घ्या**

सचोटी आणि पालन व्यवस्था



# सहा समूहव्यापी पालन तत्त्वे

देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन

प्रतिशोधाची भीती न बाळगता व्यक्त होण्याची संस्कृती जोपासणे

निष्पक्ष स्पर्धेला प्रोत्साहन देणे




नैतिक, पर्यावरणीय आणि सामाजिक स्वारस्यांचा आदर करणे

भ्रष्टाचार किंवा इतर कोणत्याही गुन्हेगारी कृत्यापासून मुक्त व्यवसायासाठी समर्पित

मानवाधिकारांचे संरक्षण

# लाचखोरी आणि भ्रष्टाचाराला नकार द्या

आपल्या उत्पादनांची आणि सेवांची गुणवत्ता यावर आपण ग्राहक आणि व्यवसाय जिंकण्यासाठी वचनबद्ध आहोत आणि कायद्याचे पालन करतो – लाचखोरी किंवा इतर कोणतीही अनैतिक किंवा बेकायदेशीर कृती करून आपण कधीच स्वतःसाठी फायदा घेत नाही.

आपण जिथे काम करतो तिथे लाचखोरी रोखणारे आणि भ्रष्टाचारविरोधी कायदे नेहमी पाळतो, संशयास्पद वर्तनाबाबत सतर्क राहतो आणि 'सेम्परलाइन' मार्गे तात्काळ चिंता नोंदवतो.

## व्यवसाय मिळवण्यासाठी, टिकवण्यासाठी किंवा अन्याय्य फायदा घेण्यासाठी आम्ही कधीच लाचखोरी करत नाही

### लाचखोरीला नेहमी नकार द्या

लाचखोरीबाबत आम्ही शून्य सहनशीलता ठेवतो. आम्ही कधीही सार्वजनिक अधिकारी किंवा खाजगी व्यक्तीला थेट, अप्रत्यक्षपणे किंवा तिसऱ्या व्यक्तीमार्फत कोणत्याही प्रकारची लाच सुविधा, देयकासह न देता, न देऊन किंवा न मान्य करून देत नाही. आम्ही कधीही थेट किंवा अप्रत्यक्षपणे कोणतीही लाच मागत नाही किंवा स्वीकारत नाही. आमच्या सर्व व्यावसायिक भागीदारांनीही हीच वचनबद्धता पाळावी, अशी आमची अपेक्षा आहे.

### आम्ही गुणवत्तेशी तडजोड करत नाही.

यशस्वी होण्यासाठी आम्ही कठोर परिश्रम करतो. एखादा करार पूर्ण करण्यासाठी, ग्राहक राखण्यासाठी किंवा प्रक्रिया गतिमान करण्यासाठी मौल्यवान वस्तू देणे किंवा स्वीकारणे हे आकर्षक वाटू शकते, परंतु आम्ही तसे करणार नाही. दीर्घकाळात ते कधीही फायदेशीर ठरत नाही. ते आकर्षक वाटू शकते, पण ते करू नका. आम्ही कधीही व्यावसायिक निर्णयांवर किंवा सरकारी कृतींवर अयोग्यरीत्या प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करत नाही.
भ्रष्ट वागणूक आपली प्रतिमा खराब करते, आपल्या उत्पादनांची आणि सेवांची गुणवत्ता घसरते, खर्च वाढतो आणि त्यामुळे दंड, खटले, गुन्हे दाखल होणे, व्यवसायाचे नुकसान किंवा सरकारी निविदांमधून वगळले जाणे असे गंभीर परिणाम होऊ शकतात.

### धोक्याचे व्यवस्थापन

आम्ही सार्वजनिक संवाद, फायदे, प्रायोजकत्वे आणि देणग्या नीट हाताळतो; व्यवसाय भागीदारांची तपासणी करतो; हितसंबंधांतील संघर्ष टाळतो; राजकीय देणग्यांना मर्यादा ठेवतो आणि योग्य नोंदी ठेवतो. अशा स्पष्ट प्रक्रिया आणि नियमांमुळे आम्ही लाचखोरी आणि भ्रष्टाचाराचे धोके टाळतो.

**अधिक जाणून घ्या**

समूह लाचखोरी प्रतिबंधक आणि भ्रष्टाचारविरोधी कार्यक्रम

समूह लाचखोरी प्रतिबंधक आणि भ्रष्टाचारविरोधी धोरण



## स्वतःला विचारा...

**तुम्ही एखाद्या व्यक्तीच्या निर्णयावर प्रभाव टाकण्याचा किंवा अन्याय्य फायदा मिळवण्याचा प्रयत्न करत नाही याची तुम्हाला खात्री आहे का?**

- ✖ भेटवस्तू, अनुग्रह किंवा ऑफर यांसारख्या लहान सूचक कृतीदेखील मर्यादा ओलांडू शकतात.
- ✖ एखाद्या व्यक्तीचा विवेक किंवा निर्णय यांवर अयोग्य प्रकारे प्रभाव टाकण्याच्या उद्देशाने थेट अथवा अप्रत्यक्षपणे, हे तृतीय पक्षांद्वारे करण्याच्या समावेशासह, कधीही एखादी मौल्यवान गोष्ट देऊ करणे, देणे, अधिकृत करणे, मागणे, तिची विनंती करणे, ती स्वीकारणे किंवा मिळवणे हे करू नका.

**ही लाच असू शकते का?**

- ! एखादी व्यक्ती व्यवसायासंबंधी निर्णयाच्या मोबदल्यात पैसे, भेटवस्तू, प्रवास किंवा विशेष अनुग्रह देऊ करत असल्यास, ती लाच असू शकते. इतरांना हे काळल्यास तुम्हाला अस्वस्थ वाटेल का? तअसे असल्यास, ते करू नका.



## स्वतःला विचारा...

### तुम्ही तुमच्या व्यवसाय भागीदाराची तपासणी केली का?

पुरवठादार, ग्राहक, एजंट आणि इतर तृतीय पक्ष संशयास्पद वागणुकीत सहभागी नाहीत याची आम्ही नेहमी तपासणी करतो. आमच्या वतीने काम करणारे विक्री एजंट, सल्लागार किंवा इतर कोणीही लाच देत नाहीत, देऊ करत नाहीत, स्वीकारत नाहीत किंवा कोणत्याही निर्णयावर चुकीचा प्रभाव टाकत नाहीत याची आम्ही खात्री करतो.

### का, किती वेळा, किती? अयोग्य वाटले का?

फायदे मिळवताना आणि घेताना ते मध्यम, योग्य, वाजवी आणि प्रमाणात आहेत याची खात्री करा. एकाच व्यक्तीला वारंवार किंवा साचलेले फायदे देऊ नका. सार्वजनिक अधिकारी फायदे घेऊ शकतात का, हे तपासण्यासाठी स्थानिक कायदे पाहा. दिलेले किंवा घेतलेले फायदे लोकांना कसे वाटतील, याचा विचार करा. तुमच्या टीम लीडला याची माहिती द्या आणि गरज असल्यास आमच्या फायदे देणे आणि मिळवणे या पोर्टलवर मंजुरी घ्या.

### एखादा करार किंवा निर्णय प्रलंबित आहे का?

वाटाघाटींदरम्यान फायदे देणे किंवा स्वीकारणे टाळा – ते अनुचित प्रभाव किंवा लाचखोरी म्हणून पाहिले जाऊ शकते.

### तुम्हाला मंजुरी हवी आहे का?

मौल्यवान वस्तू देण्यापूर्वी किंवा घेण्यापूर्वी आमची मार्गदर्शक तत्त्वे नीट तपासा. सार्वजनिक अधिकाऱ्यांसाठी किंवा ठरवलेल्या मर्यादेपेक्षा वस्तूचे मूल्य जास्त असल्यास, मंजुरी घेणे आवश्यक आहे.

### तुम्हाला सुविधा पेमेंट देण्यास सांगितले गेले आहे का?

काही देशांमध्ये सरकारी अधिकारी परवाना, परमिट, व्हिसा किंवा सीमाशुल्क मंजुरीसारखी नित्याची कृती लवकर करण्यासाठी लहान रक्कम मागू शकतात. नकार दिल्याने तुमची सुरक्षितता धोक्यात येत नसेल, तर हे पेमेंट करू नका. असे काही घडल्यास ताबडतोब पालन विभागाला कळवा.

### मदत हवी आहे का?

आमच्या मार्गदर्शक तत्त्वांचे आणि मंजुरी प्रक्रियेचे अनुसरण करा.

### खात्री नसल्यास, तुमच्या टीम लीडला विचारा किंवा पालनाशी येथे संपर्क साधा

compliance@semperitgroup.com.

# भ्रष्टाचार आणि लाचखोरी रोखण्यासाठी, यांपासून सावध रहा...

## भेटवस्तू, आदरातिथ्य आणि मनोरंजन

साध्या भेटवस्तू, जेवण किंवा आमंत्रणे यामुळे विश्वास वाढतो आणि व्यावसायिक नातेसंबंध मजबूत होतात. पण काय योग्य आहे हे देश आणि संस्कृतीनुसार बदलते. म्हणून नेहमी विचारपूर्वक निर्णय घ्या. स्थानिक कायदे काय सांगतात, दिलेला फायदा लाच समजला जाऊ शकतो का, तो अयोग्य तर नाही ना – हे तपासा. सर्व फायदे आमच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसारच द्या किंवा घ्या.
सोप्या भाषेत सांगायचं तर: दिलेले किंवा घेतलेले फायदे साधे आणि प्रसंगानुसार असावेत. त्यांचा उद्देश फायदा मिळवणे, निर्णयांवर प्रभाव टाकणे किंवा हितसंबंधांचा संघर्ष निर्माण करणे असा नसावा.

## रोख आणि सुविधा पेमेंट

आम्ही रोख रक्कम किंवा तिच्यासारखी कोणतीही गोष्ट देत नाही किंवा घेत नाही. यामध्ये सुविधा पेमेंटही येतात – म्हणजे सरकारी काम लवकर व्हावं म्हणून दिलेली लहान रक्कम. काही देशांत ही सामान्य वाटू शकते, पण ती बेकायदेशीर असते आणि लाच म्हणून ओळखली जाते. अशा पेमेंट करणे तुम्हाला कधीच परवानगी नाही.

## सार्वजनिक अधिकाऱ्यांशी व्यवहार करणे

सरकारी अधिकाऱ्यांशी किंवा सरकारी संस्थांच्या प्रतिनिधींशी बोलताना नेहमी जास्त सावधगिरी बाळगा. अगदी लहान कृतीदेखील निर्णयावर चुकीचा प्रभाव टाकण्याचा प्रयत्न म्हणून समजल्या जाऊ शकतात. लागू कायदे आणि आमची अंतर्गत मार्गदर्शक तत्त्वे यांचे नेहमी पालन करा. शक्य असल्यास, सार्वजनिक अधिकाऱ्यांना एकटे भेटणे टाळा.

## राजकीय योगदाने आणि लॉबिंग


आम्ही राजकीय पक्ष, संघटना किंवा स्वतंत्र राजकारणी यांना कोणतेही थेट किंवा अप्रत्यक्ष योगदान देत नाही. आमचे सर्व उपक्रम कायदेशीर, पारदर्शक आणि पूर्वमंजुरी मिळालेले असणे आवश्यक आहे.

## देणग्या आणि प्रायोजकत्वे

आम्ही आमच्या मूल्यांशी सुसंगत आणि समुदायाच्या हितासाठी असलेल्या देणग्या व प्रायोजकत्वांना पाठिंबा देतो. या गोष्टी पारदर्शक असाव्यात, योग्य मंजुरी घेतलेली आणि नीट नोंदवलेल्या असाव्यात. त्यांचा उद्देश कधीही व्यवसाय निर्णयांवर प्रभाव टाकण्याचा नसावा.

## व्यवसाय भागीदार

कोणतीही भागीदारी करण्यापूर्वी किंवा तिचे नूतनीकरण करण्यापूर्वी, संभाव्य धोक्यांचे मूल्यांकन करण्यासाठी आम्ही व्यवसाय भागीदार तपासणी करतो. भागीदारांकडून नैतिकतेने वागण्याची, लागू असलेल्या कायद्यांचे पालन करण्याची आणि कोणत्याही पालन पुनरावलोकनांमध्ये किंवा लेखापरीक्षणांमध्ये सहकार्य करण्याची अपेक्षा केली जाते.



### अधिक जाणून घ्या

समूह तृतीय पक्ष मध्यस्थ मार्गदर्शक तत्त्वे

समूह भेटवस्तू, आदरातिथ्य आणि मनोरंजन यांसंबंधी मार्गदर्शक तत्त्वे

समूह देणग्या आणि प्रायोजकत्वे यासंबंधी मार्गदर्शक तत्त्वे

व्यवसाय भागीदारांशी व्यवहार करणे

# हितसंबंधांचे संघर्ष

कामाच्या ठिकाणी घेतलेले निर्णय नेहमीच वस्तुनिष्ठ असावेत आणि ते सेम्पेरिटच्या हितासाठीच असावेत. पण कधी कधी वैयक्तिक, आर्थिक किंवा इतर नातेसंबंध आपल्या व्यावसायिक निर्णयांवर प्रभाव टाकू शकतात – किंवा तसे वाटू शकते.

अशा परिस्थिती अनवधानाने निर्माण होऊ शकतात. याचा अर्थ असा नाही की कोणी जाणीवपूर्वक चुकीचे वागले आहे. पण जर याचा व्यवसायावर परिणाम होत असेल, किंवा निष्पक्षता आणि प्रामाणिकपणाबाबत शंका निर्माण होत असेल, तर ही गोष्ट गंभीर ठरू शकते. कधी कधी हितसंबंधांतील संघर्ष प्रत्यक्ष नसला तरी त्याचा आभासही तितकाच हानिकारक ठरू शकतो.

## सेम्पेरिटच्या सर्वोत्तम हितासाठी कृती करणे

हितसंबंधांतील संघर्ष ओळखणे नेहमी सोपे नसते. सेम्पेरिटचे कर्मचारी म्हणून, आपल्या कामात वैयक्तिक किंवा जवळच्या लोकांच्या हितसंबंधांचा हस्तक्षेप होतो का, हे ओळखणे हे आपले जबाबदारीचे काम आहे.

आम्ही असे कोणतेही आर्थिक किंवा वैयक्तिक संबंध टाळतो जे आमच्या निर्णयस्वातंत्र्यावर परिणाम करू शकतात किंवा तसे वाटू शकतात. नियुक्ती, पदोन्नती किंवा व्यावसायिक निर्णय घेताना आम्ही वैयक्तिक संबंध दूर ठेवतो. कुटुंबीय, मित्रमैत्रिणी किंवा त्यांच्या कंपन्यांशी संबंधित कोणतेही अनुग्रह करत नाही किंवा निर्णय घेत नाही.

तृतीय पक्ष निवडताना आम्ही गुणवत्ता, विश्वासार्हता आणि किंमत यांसारख्या वस्तुनिष्ठ गोष्टींचा विचार करतो, वैयक्तिक नात्यांचा नाही. स्पर्धक असलेल्या बाहेरील भूमिका स्वीकारण्यापूर्वी, सहव्यवसाय सुरू करण्यापूर्वी किंवा गुंतवणूक करण्यापूर्वी, मंजुरी लागते का हे आम्ही तपासतो.

आम्ही कधीही वैयक्तिक फायद्यासाठी व्यवसायातील संधी वापरत नाही, कंपनीची माहिती वापरत नाही किंवा सेम्पेरिटशी स्पर्धा करणाऱ्या उपक्रमात सहभागी होत नाही. आम्ही किंमत, धोरणे आणि भविष्यातील योजना यांसारखी गोपनीय माहिती सुरक्षित ठेवतो.

## हितसंबंधांतील संघर्ष ओळखणे आणि टाळणे

कधी कधी परिस्थिती स्पष्ट नसते. अशा वेळी आम्ही थांबतो, विचार करतो आणि योग्य मार्गदर्शन घेतो. आपली सचोटी आणि विश्वासार्हता टिकवण्यासाठी कोणताही प्रत्यक्ष, संभाव्य किंवा दिसणारा हितसंबंध टाळणे, ओळखणे आणि योग्य प्रकारे हाताळणे खूप महत्वाचे आहे.

जर एखाद्या परिस्थितीत हितसंबंधांचा संघर्ष असू शकतो असे वाटत असेल, तर आम्ही तो आमच्या टीम लीडकडे उघड करतो. टीम लीड आणि पालन विभाग मिळून परिस्थितीचे मूल्यांकन करतात आणि योग्य सल्ला देतात. संभाव्य संघर्ष लक्षात येताच आम्ही पारदर्शकपणे पावले उचलतो. असा संघर्ष लपवणे हे गैरवर्तन मानले जाऊ शकते.

### अधिक जाणून घ्या

समूह हितसंबंधातील संघर्षासंबंधी धोरण

परिस्थिती आणि प्रसंग यांची सूची हितसंबंधांतील संघर्ष कुठे उद्भवू शकतो

प्रकटीकरण फॉर्म आणि मूल्यांकन



## झटपट स्व-तपासणी

- तुमच्या कामाच्या ठिकाणच्या जबाबदाऱ्या तुमच्या खाजगी हितसंबंधांवर अतिक्रमण करतात का?
- तुमच्या निर्णयाचा तुम्हाला, तुमच्या मित्राला किंवा नातेवाईकाला, आर्थिकदृष्ट्या अथवा व्यावसायिकदृष्ट्या फायदा होतो का?
- इतरांना तुमचा निर्णय पक्षपाती किंवा अन्याय्य वाटू शकेल का किंवा तुम्हाला परिस्थितीचा वैयक्तिक फायदा होत आहे का?
- यामुळे सेम्पेरिटचा लौकिक किंवा वस्तुनिष्ठता कमी होऊ शकते का?
- तुमचे वैयक्तिक स्वारस्य असलेल्या निर्णयांवर तुम्ही प्रभाव टाकत आहात का?
- तुमचे उत्तर “होय” किंवा “कदाचित” असल्यास, तुमच्या टीम लीडकडे परिस्थिती उघड करा.

**मदत हवी आहे का?**
तुमच्या टीम लीडशी किंवा compliance@semperitgroup.com शी संपर्क साधा.



## छाननी करा, तपासा, मंजुऱ्या मिळवा आणि सल्ला घ्या

- नवीन व्यवसाय संबंध किंवा व्यवहार सुरू करण्यापूर्वी, आम्ही नियुक्त केलेले टूल वापरून व्यवसाय भागीदारांची तपासणी करतो. यामध्ये निर्बंध, मालकीची रचना, उच्च जोखीम क्षेत्रे, लाचखोरी, भ्रष्टाचार आणि पालनासंबंधी इतर संभाव्य समस्या ओळखून त्यांचे व्यवस्थापन करतो.
- आपण खरेदी, विक्री किंवा हस्तांतरण करत असलेल्या सर्व उत्पादने, वस्तू, सेवा आणि तंत्रज्ञान यांची तपासणी लागू असलेल्या निर्बंध, बंदी आणि दुहेरी वापर नियमांनुसार करा. व्यवहार सुरू करण्यापूर्वी आवश्यक मंजुरी किंवा संमती मिळवणे आवश्यक आहे.
- संवेदनशील ठिकाणे, प्रतिबंधित पक्ष किंवा नियंत्रित वस्तू यांचा समावेश असलेल्या कोणत्याही व्यवहाराची नोंद आम्ही पुढील पुनरावलोकनासाठी समूह पालन विभागाकडे करतो.
- पालनासंबंधी अनिवार्य प्रशिक्षण सत्रांना नियमितपणे उपस्थित राहणे आणि बदलणाऱ्या नियम, कायदे व धोरणांबाबत स्वतःला सतत अद्ययावत ठेवणे ही तुमच्या भूमिकेतील एक महत्त्वाची जबाबदारी आहे. हे केवळ वैयक्तिक जबाबदारीचे नव्हे, तर सेम्पेरिटच्या नैतिकता आणि कायदेशीर बांधिलकीचेही स्पष्ट प्रतिबिंब आहे.

**मदत हवी आहे का?**
समूह पालन विभागाशी compliance@semperitgroup.com वर संपर्क साधा.

# व्यापार नियंत्रणे आणि निर्बंध

आम्ही अनेक देशांतील भागीदार आणि ग्राहकांसोबत काम करतो. त्यामुळे आमच्या व्यवसायावर विविध व्यापार नियंत्रणे, निर्यात कायदे आणि दुहेरी वापर उत्पादने व तंत्रज्ञान नियंत्रित करणारे नियम लागू होतात.

## जबाबदारीने व्यापार करणे

हे नियम काही व्यवहार, हस्तांतरण, उत्पादने, सेवा किंवा विशिष्ट देश, संस्था किंवा व्यक्तींशी व्यवहारांवर लागू होतात.

सेम्पेरिटची उत्पादने आणि तंत्रज्ञान अशा प्रकारे वापरली जाऊ नयेत की ज्यामुळे हानी होईल किंवा आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन होईल. हे टाळण्यासाठी आम्ही सर्व लागू व्यापार निर्बंध, बंदी, प्रतिबंध, दहशतवादविरोधी कायदे आणि आमच्या वस्तू व सेवांच्या गैरवापरास प्रतिबंध करणाऱ्या इतर नियमांचे काटेकोर पालन करतो. आमच्या भागीदारांनीही हे नियम पाळावेत, अशी आमची अपेक्षा असते.

काही साहित्य, उत्पादने, व्यवहार, ग्राहक किंवा प्रदेश हे प्रतिबंधित असू शकतात. त्यामुळे हे प्रतिबंध आणि निर्बंध काय परिणाम करू शकतात, हे समजून घेणे गरजेचे आहे.

## व्यवसाय भागीदार तपासणी

नवीन व्यवसाय संबंध किंवा व्यवहार सुरू करण्यापूर्वी आम्ही व्यवसाय भागीदार तपासतो. ही एक तत्परता प्रक्रिया आहे, जी धोके ओळखण्यासाठी आणि त्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी तयार केली आहे. यामध्ये दुसऱ्या पक्षाचे किंवा त्यांच्या वस्तू व सेवांचे निर्बंध किंवा बंदीखाली येतात का, किंवा त्या दुहेरी वापराच्या वस्तू आहेत का, याची पडताळणी करतो.

हा सक्रिय दृष्टिकोन महत्त्वाचा आहे, कारण नियमांचे उल्लंघन केल्यास सेम्पेरिट आणि संबंधित व्यक्तींना गंभीर कायदेशीर आणि प्रतिमेसंबंधी परिणाम भोगावे लागू शकतात.

**“आपण जागतिक स्तरावर व्यवसाय करत असल्यामुळे, व्यापार नियम आणि निर्बंध विचारात घेताना जागतिक दृष्टि-कोन ठेवणे आवश्यक आहे.”**

**अधिक जाणून घ्या** समूह व्यवसाय भागीदार तपासणीसाठी मार्गदर्शक तत्वे तपासा

# निष्पक्ष स्पर्धा

## मुक्त आणि पारदर्शक व्यवहारासाठी आमची वचनबद्धता

सेम्पेरिटमध्ये आम्ही यशासाठी स्पर्धा करतो, पण नेहमी निष्पक्षपणे, पारदर्शकपणे आणि मक्तेदारीविरोधी व स्पर्धा कायद्यांचे पालन करून. या कायद्यांचे उल्लंघन केल्यास सेम्पेरिटसह संबंधित व्यक्तींनाही मोठा आर्थिक दंड, कायदेशीर कारवाई आणि प्रतिमेचे नुकसान होऊ शकते.

प्रत्येक निर्णयातून निष्पक्ष आणि पारदर्शक व्यवसाय पद्धतींचे प्रतिबिंब दिसले पाहिजे. स्पर्धा मर्यादित करणारे किंवा तसे वाटणारे कोणतेही वर्तन टाळा – जसे की समन्वित कृती, अनौपचारिक चर्चा किंवा स्पर्धकांसोबतचे □सभ्य करार□.

## स्पर्धकांसोबत करार आणि संवाद - काय टाळावे

कधीही अशा करारात किंवा संवादात सहभागी होऊ नका, ज्यामुळे:

- किमती, सवलती, क्रेडिट किंवा इतर व्यापार अटी ठरवणे, सहमती देणे किंवा त्यावर प्रभाव टाकणे होईल
- बाजारपेठा, ग्राहक, प्रदेश किंवा उत्पादने यांचे वाटप किंवा विभागणी होईल
- उत्पादन, विक्री किंवा सेवा मर्यादित किंवा नियंत्रित केली जाईल
- विशिष्ट ग्राहक किंवा पुरवठादारांशी बहिष्कार घालणे किंवा व्यवहार न करणे
- संगनमत, एकत्रित कृती किंवा निविदा प्रक्रियेत फेरफार करणाऱ्या पद्धतीत सहभाग
- किमती, ग्राहक, खर्च, बाजारातील वाटा, नवीन उपक्रम किंवा गोपनीय माहिती शेअर करणे किंवा त्यावर चर्चा करणे

## बाजारपेठेतील वर्चस्वाचा गैरवापर टाळा

आम्ही आमच्या बाजारातील स्थानाचा वापर कोणत्याही पुरवठादार, वितरक किंवा ग्राहकावर अन्याय्य अटी लादण्यासाठी करत नाही. आम्ही दबाव टाकत नाही, अनावश्यक अडथळे आणत नाही आणि अनन्यता करारांसारख्या अटी लादत नाही. बाजारपेठेतील वर्चस्वाचा गैरवापर करणाऱ्या कोणत्याही धोरणांपासून आम्ही दूर राहतोअधिक जाणून घ्या.


### अधिक जाणून घ्या

समूह मक्तेदारीविरोधी आणि स्पर्धाविरोधी धोरण

समूह स्पर्धक मीटिंगसंबंधी मार्गदर्शक तत्त्व

समूह व्यवसाय भागीदार तपासणी मार्गदर्शक तत्त्व

मक्तेदारीविरोधी मार्गदर्शक तत्त्वे



## करा...

- **निष्पक्ष स्पर्धा करा**
  अन्याय्य डावपेचांपेक्षा नावीन्य आणि कार्यक्षमता यांद्वारे अधिक चांगली उत्पादने, सेवा व किमती देऊ करा.

- **वाजवी किंमत धोरणांचे अनुसरण करा**
  स्पर्धकांशी संगनमत किंवा करार करण्याऐवजी बाजारपेठेतील स्पर्धेच्या आधारे किमती निश्चित करा.

- **करारांच्या पारदर्शकतेची खात्री करा**
  व्यवसाय करार, विलीनीकरणे आणि अधिग्रहण स्पर्धा यांसंबंधी कायदे व नियामक मंजुऱ्यांचे पालन करणे आवश्यक आहे.


- **माहिती गोळा करा**
  फक्त सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेली माहिती वापरा, जसे की ट्रेड शो आणि सार्वजनिक उद्योग कार्यक्रमांमध्ये किंवा ब्रोशर, पुरवठादार मॅन्युअल व मीडिया आणि विश्लेषक अहवाल यांमधून मिळालेली माहिती.

- **स्पर्धकांशी संवाद साधा**
  योग्य संवादासाठी आमची मार्गदर्शक तत्वे वापरा आणि स्पर्धकांशी संपर्क साधण्याचा कोणताही प्रयत्न झाल्यास त्याची तक्रार करा.

- **कायदेशीर तज्ज्ञांचा सल्ला घ्या**
  वस्तू किंवा सेवांचा वापर, पुनर्विक्री अथवा किंमत निर्धारण कसे केले जावे याबाबत अनन्य अधिकार देण्यापूर्वी किंवा मर्यादा घालण्यापूर्वी, आमच्या कायदेशीर विभागाशी सल्लामसलत करण्याची खात्री करा.

- **स्पर्धाविरोधी पद्धतींची तक्रार करा**
  तुम्हाला किंमत निश्चिती, बोलीमधील हेरफेर किंवा मक्तेदारीचा गैरवापर आढळल्यास, त्यांची तक्रार समूह पालन विभागाकडे करा (compliance@semperitgroup.com).

**मदत हवी आहे का?**
समूह पालन विभागाशी संपर्क साधा: compliance@semperitgroup.com.



## करा...

- व्यवसाय भागीदार तपासणी आणि आर्थिक तपासणी यांद्वारे आपण कोणासोबत व्यवसाय करत आहोत याची नेहमी पडताळणी करा.
- अनपेक्षित मोठी पेमेंट किंवा व्यावसायिक भागीदारांमध्ये अचानक बदल यांसारख्या असामान्य व्यवहारांपासून सावध रहा.
- रोख व्यवहार टाळा आणि सर्व पेमेंट माग ठेवता येणाऱ्या बँकिंग चॅनलद्वारे होतील याची खात्री करा.
- संशयास्पद वाटणारी कोणतीही गोष्ट तुमच्या टीम लीडला किंवा पालन टीमला कळवा – कोणताही प्रश्न खूप लहान नसतो.

**मदत हवी आहे का?**
समूह पालन विभागाशी संपर्क साधा: compliance@semperitgroup.com.

# मनी लॉँडरिंग रोखणे

आम्ही मनी लॉँडरिंग, कर चोरी किंवा आर्थिक व्यवहारांचा कायदेशीर उद्देश लपवणाऱ्या कोणत्याही प्रकारांना स्पष्टपणे विरोध करतो.

कोणताही निधी लपवण्यासाठी किंवा व्यवहारामागील खरे कारण लपवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कृतींमध्ये आम्ही सहभागी होत नाही, मदत करत नाही किंवा ती सहन करत नाही.

यामध्ये कर चुकवण्यासाठी किंवा भागधारकांना चुकीची माहिती देण्यासाठी केलेल्या कोणत्याही प्रकारच्या योजना समाविष्ट आहेत.

सर्व व्यवहार पारदर्शक, कायदेशीर आणि योग्य असावेत, अशी आमच्याकडून अपेक्षा आहे आणि आमच्या व्यावसायिक भागीदारांकडूनही आम्ही हीच अपेक्षा ठेवतो.

### सेम्पेरिटमध्ये काही अशा पद्धती आहेत, ज्या चुकून मनी लॉँडरिंगचे दार उघडू शकतात:

- अज्ञात, पडताळणी न केलेल्या किंवा असंबंधित ग्राहकांकडून अथवा देशांकडून पेमेंट स्वीकारणे
- फक्त कागदावर अस्तित्वात असलेल्या कंपन्यांसोबत (तथाकथित शेल कंपन्या) व्यवसाय करणे
- रोख रकमेची मोठी पेमेंट स्वीकारणे, अतिरिक्त पैसे देणे किंवा रोख रकमेच्या समतुल्य रक्कम देणे अथवा स्वीकारणे, ज्यानंतर अनेकदा परताव्यांसाठी विनंत्या केल्या जातात.
- ग्राहकाच्या व्यापाराशी किंवा व्यवसायाशी असामान्य अथवा विसंगत असलेल्या ऑर्डर, खरेदी किंवा पेमेंट
- असामान्यरीत्या गुंतागुंतीच्या व्यवहार रचना
- योग्य तपासणी आणि दस्तऐवज प्रक्रिया वगळणे

हे धोके टाळण्यासाठी, फक्त विश्वासार्ह भागीदारांसोबत काम करण्याची, कायदेशीर पेमेंट प्रक्रियांचे पालन करण्याची आणि कोणत्याही संशयास्पद गोष्टीची तक्रार करण्याची आम्ही खात्री करतो.

# 03 आम्ही सक्षम करतो आणि आदर देतो



सेम्पेरिटमध्ये आम्ही मानतो की सक्षमीकरण आणि आदर हे जबाबदार आणि टिकाऊ व्यवसायाचे मूलभूत आधार आहेत.

आम्ही मानवाधिकारांचे पालन करतो, सामाजिक आणि कामगार हक्कांचा सन्मान करतो आणि कामाच्या ठिकाणी शून्य अपघातांचे उद्दिष्ट ठेवतो. आमच्या कंपनीत आणि संपूर्ण मूल्य साखळीत आरोग्य, सुरक्षितता आणि पर्यावरण रक्षण यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

आम्ही एकमेकांशी आणि समाजाशी सन्मानाने वागतो. समावेशकता, विश्वास आणि परस्पर मदतीची संस्कृती आम्ही जपतो.

मुक्त आणि आदरयुक्त संवाद हे आमच्या यशाचे मुख्य कारण आहे. यामुळे सहकार्य वाढते, नावीन्याला चालना मिळते आणि आमच्या सामायिक मूल्यांना बळकटी मिळते.

**“एकत्र येऊन आपण असे कार्य-स्थळ घडवतो, जिथे प्रत्येकाला महत्त्व वाटते, त्यांचे ऐकले जाते आणि ते आत्मविश्वासाने योगदान देऊ शकतात.”**

# मानवाधिकार

सेम्पेरिटमध्ये, प्रत्येक कर्मचाऱ्याला ऐकले जाण्याचा, समर्थन मिळण्याचा आणि न्याय्य वागणुकीचा पूर्ण हक्क आहे. विश्वास आणि मूल्याधारित संस्कृती निर्माण करण्यासाठी हे अत्यावश्यक आहे.

आम्ही आमच्या सर्व उपक्रमांमध्ये प्रतिष्ठा, निष्पक्षता आणि समानता यांचा समावेश करतो. आमच्या मूल्य साखळीतील भागीदारांसोबत स्पष्ट अपेक्षा ठेवून आणि जवळून काम करून, आम्ही मानवाधिकारांचा आदर करतो आणि त्यांना प्रोत्साहन देतो.

आमची नैतिक व्यवसाय पद्धतींबाबतची वचनबद्धता आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त मानकांवर आधारित आहे – जसे की संयुक्त राष्ट्रांचे व्यवसाय व मानवाधिकार मार्गदर्शक तत्वे, ILO ची मुख्य कामगार मानके आणि स्थानिक कायदे. या तत्त्वांवर आमचे कर्मचारी धोरण आणि पुरवठादार धोरण आधारित आहे.

हे तत्त्व पाळणे आवश्यक आहे, जेणेकरून कामाच्या ठिकाणी योग्य संबंध तयार होतील आणि टिकतील, तसेच सेम्पेरिटच्या आत आणि बाहेरच्या समुदायांच्या हक्कांचा आणि हितसंबंधांचा आदर केला जाईल.

आम्ही नियमित प्रशिक्षण आणि जागरूकता उपक्रमांद्वारे कर्मचाऱ्यांना सक्षम करतो. यामुळे एकत्र काम करण्याच्या पद्धतीत सातत्याने सुधारणा होते. मानवाधिकारांशी संबंधित धोके ओळखणे, त्यांना रोखणे आणि त्यांचे निराकरण करणे हा आमचा सक्रिय दृष्टिकोन आहे. तो आमच्या आधुनिक गुलामगिरी विधानात आणि शाश्वतता अहवालात स्पष्टपणे नमूद केला आहे.

**“आम्ही सर्व भागधारकांशी - कर्मचारी, ग्राहक, पुरवठादार आणि भागीदार - आदर, पारदर्शक-ता, निष्पक्षता आणि सचोटीने वागतो.”**

### अधिक जाणून घ्या


लोक धोरण

समूह पुरवठादार धोरण

मानवाधिकार आणि आधुनिक गुलामगिरीसंबंधी विधान

विविधतेची सनद

सेम्पेरिट वार्षिक अहवाल - शाश्वतता विधान





# सामाजिक आणि कामगार मानके

आमचा सामाजिक आणि कामगार मानकांबद्दलचा दृष्टिकोन आंतरराष्ट्रीय कामगार तत्त्वे, स्थानिक कायदे आणि काय योग्य आहे याची स्पष्ट जाणीव यावर आधारित आहे. ही मानके असे सुरक्षित आणि प्रेरणादायी कार्यस्थळ तयार करण्यास मदत करतात, जिथे प्रत्येकाला महत्त्व वाटते आणि प्रगतीची संधी मिळते.

हीच तत्वे सेम्पेरिटला असे स्थान बनवतात, जिथे कुशल आणि प्रतिभावान लोक काम करायला उत्सुक असतात आणि दीर्घकाळ टिकून राहतात. आपण सर्वजण आपल्या कृती, निर्णय आणि एकमेकांशी वागण्याच्या पद्धतीतून आदरयुक्त आणि सकारात्मक कार्यसंस्कृती घडवण्यात महत्त्वाचे योगदान देतो.

## बालमजुरी रोखणे

आम्हाला विश्वास आहे की प्रत्येक मुलाला सुरक्षित आणि निरोगी बालपण मिळाले पाहिजे. म्हणूनच बालमजुरी किंवा कोणत्याही प्रकारच्या शोषणाबाबत आम्ही शून्य सहनशीलतेचे धोरण पाळतो.

आम्ही नेहमी खात्री करतो की कामावर घेतलेल्या प्रत्येक व्यक्तीने कायदेशीर किमान वय किंवा अनिवार्य शिक्षण पूर्ण करण्याचे वय – यापैकी जे अधिक असेल ते – पूर्ण केलेले असते. हे संयुक्त राष्ट्रांचे बाल अधिकार अधिवेशन, ILO अधिवेशन क्रमांक 138 आणि 182 तसेच ILO शिफारस क्रमांक 146 यानुसार आहे.

## अनैच्छिक मजुरी आणि मानवी तस्करी प्रतिबंध

आमच्या कामामध्ये किंवा मूल्य साखळीमध्ये बेकायदेशीर, दुरुपयुक्त, सक्तीची किंवा वेठबिगार मजुरी तसेच कोणत्याही प्रकारच्या मानवी तस्करीचा आम्ही तीव्र विरोध करतो आणि ती सहन करत नाही.

यामध्ये जबरदस्तीने काम करवून घेणे, कर्जबाजारीपणामुळे वेठबिगार बनवणे, ओळखपत्रे काढून घेणे किंवा हालचालीचे स्वातंत्र्य मर्यादित करणे यांसारख्या पद्धतींचा समावेश होतो (ILO सेक्शन क्रमांक 29 आणि 105). आम्ही पुरवठादार आणि भागीदार निवडताना तसेच त्यांच्यासोबत काम करताना नेहमी योग्य काळजी घेतो आणि तत्परता बाळगतो, जेणेकरून अशा अन्यायकारक प्रथांना थारा मिळणार नाही. ही भूमिका केवळ कायदेशीर जबाबदारी म्हणून नव्हे, तर आमच्या मूल्यांशी सुसंगत अशी नैतिक बांधिलकी म्हणून आम्ही स्वीकारतो.

## वाजवी वेतन आणि कामाचे तास

आम्ही खात्री करतो, की सर्व कर्मचाऱ्यांना स्थानिक बाजारपेठेच्या परिस्थितीशी सुसंगत आणि त्यांच्या भूमिकांशी संबद्ध जबाबदाऱ्या प्रतिबिंबित करणारा वाजवी मोबदला मिळेल. यामध्ये लागू असलेल्या सामूहिक करारांचे पालन करणे आणि समान कामासाठी समान वेतनाची खात्री करणे (ILO सेक्शन क्र. 100) समाविष्ट आहे. आम्ही कामाच्या जास्तीत जास्त तासांबाबत स्थानिक कायद्यांचा आदर करतो आणि कर्मचाऱ्यांना आवश्यक असलेला विश्रांती आणि पूर्वावस्थालाभ यांसाठी वेळ मिळावा याची खात्री करतो (ILO सेक्शन क्रमांक 1 आणि 14).

## संघटना आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य

सेम्पेरिटमध्ये आम्ही कर्मचाऱ्यांच्या मुक्तपणे संघटित होण्याच्या आणि सामूहिक सौदयामध्ये सहभागी होण्याच्या अधिकाराचा पूर्ण आदर करतो आणि त्याला समर्थन देतो. प्रत्येक कामगाराला भेदभाव किंवा प्रतिशोधाची भीती न बाळगता, त्यांच्या पसंतीच्या कामगार संघटना किंवा इतर प्रतिनिधी संस्था स्थापन करण्याचा, त्यात सामील होण्याचा किंवा त्यांना समर्थन देण्याचा आणि नियोक्त्याशी सामूहिकरीत्या वाटाघाटी करण्याचा अधिकार आहे (ILO सेक्शन क्रमांक 87, 98, 135 आणि 154).

सेम्पेरिट सर्व लागू कायद्यांचे पालन करते जे कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधित्वाचे संरक्षण करतात. आम्ही कामाच्या ठिकाणी प्रत्येकाला आपले मत मोकळेपणाने आणि भेदभावाशिवाय मांडता येईल याची खात्री करतो. प्रत्येक कर्मचाऱ्याने त्यांच्या नोकरीदरम्यान मोकळेपणाने आणि आदरपूर्वक आपले विचार मांडण्याचा अधिकार आहे, आणि आम्ही त्या अधिकाराचा पूर्ण सन्मान करतो.

## सुरक्षित आणि अमली पदार्थमुक्त कार्यस्थळ

सेम्पेरिटमध्ये आम्ही कर्मचाऱ्यांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य देतो. मद्य किंवा बेकायदेशीर अमली पदार्थांच्या प्रभावाखाली काम करण्यास सक्त मनाई आहे. हे पदार्थ निर्णयक्षमतेवर परिणाम करू शकतात, कामगिरी कमी करू शकतात आणि नियमांचे उल्लंघन घडवू शकतात. विशेषतः कारखान्यांमध्ये किंवा साइटवर ये-जा करताना, अशा अवस्थेमुळे गंभीर सुरक्षितता धोके निर्माण होतात. त्यामुळे आम्ही याबाबत शून्य सहनशीलतेचे धोरण पाळतो. एखादी व्यक्ती अमली पदार्थांच्या प्रभावाखाली असल्याचे आढळल्यास, सर्वांच्या सुरक्षिततेसाठी टीम लीड आवश्यक ती तपासणी आणि कारवाई करू शकतो. ही प्रक्रिया नेहमी काळजीपूर्वक आणि आदरपूर्वक केली जाते.



## सेम्पेरिट तत्त्वे

आमच्या इथे भेदभाव सहन केला जात नाही. आम्ही सर्वांना समान संधी देतो.

कामाचे जास्तीत जास्त तास स्थानिक कायद्यानुसार ठेवतो.

कायद्यानुसार लेखी रोजगार करार करतो आणि नोंद केलेल्या अटींवर कर्मचारी ठेवतो.

स्थानिक बाजारपेठ लक्षात घेऊन योग्य आणि न्याय्य मोबदला देतो.

बालमजुरी, सक्तीची मजुरी, मानवी तस्करी आणि शोषणाचे प्रकार आम्ही सहन करत नाही.

कर्मचाऱ्यांना मोकळेपणाने मत मांडण्याचा आणि अभिव्यक्तीचा अधिकार आम्ही मानतो



## आपण एकमेकांची काळजी घेऊ या. सुरक्षित कार्यस्थळ आपल्या प्रत्येकापासून सुरू होते...

- सहकाऱ्यांना आणि अर्जदारांना न्याय्य वागणूक द्या. तुम्हाला भेदभाव दिसल्यास व्यक्त व्हा.
- कृती करण्यापूर्वी किंवा बोलण्यापूर्वी विचार करा. एखादी गोष्ट अनादरयुक्त वाटत असल्यास, ती कदाचित तशीच असेल. चिंता तात्काळ कळवा.
- वेगवेगळ्या कल्पना आणि पार्श्वभूमी यांबाबत खुलेपणा बाळगा. समावेशाची सुरुवात दररोजच्या कृतींपासून होते - ऐकणे, आदर करणे आणि इतरांसोबत सहयोग करणे.
- सुरक्षित कार्यस्थळ पुरवा: अमली पदार्थांच्या प्रभावाखाली काम करू नका, कारण असे केल्याने तुम्ही स्वतःसाठी आणि इतरांसाठी धोका निर्माण करता.
- तुम्ही पुरवठादारांसोबत काम करत असल्यास, त्यांना ही तत्त्वे समजतात आणि ते त्यांचे पालन करतात याची खात्री करा.

**मदत हवी आहे का?**

तुमच्या टीम लीडशी, People&Culture शी किंवा समूह पालनाशी संपर्क साधा. compliance@semperitgroup.com येथील विभाग.

# समान संधी आणि गैर-भेदभाव

सेम्पेरिटमध्ये आम्ही मानतो की प्रत्येक व्यक्तीला निष्पक्षतेने, सन्मानाने आणि आदराने वागवले गेले पाहिजे. प्रत्येक कर्मचारी आपल्या टीममध्ये काहीतरी वेगळे आणि मौल्यवान घेऊन येतो, आणि आम्ही त्या फरकांना मान्यता देतो. नियुक्ती, प्रशिक्षण, वेतन किंवा पदोन्नती यांसारख्या निर्णयांमध्ये आम्ही केवळ कौशल्य, कामगिरी आणि क्षमता यांवर लक्ष केंद्रित करतो. व्यक्तीची पार्श्वभूमी किंवा ओळख नव्हे, तर त्यांचे योगदानच आमच्या-साठी सर्वात महत्त्वाचे असते.

आम्ही कोणत्याही प्रकारचा भेदभाव सहन करत नाही. यामध्ये वंश, वर्ण, लिंग, वय, भाषा, राष्ट्रीयत्व, धर्म, श्रद्धा, लैंगिक अभिमुखता, लिंग ओळख, वैवाहिक स्थिती, गर्भधार-णा, नागरिकत्व, अपंगत्व, सामाजिक मूळ, जात, संघ सदस्यत्व, राजकीय मतप्रवाह, माजी सैनिक किंवा लष्करी पार्श्वभूमी यांसारख्या कोणत्याही आधारावरील भेदभावाचा समावेश होतो. समानतेसाठीची आमची वचनबद्धता □□□ सेक्शन क्रमांक 100 आणि 111 तसेच महिलांविरुद्ध भेदभावाच्या निर्मूलनासाठीच्या संयुक्त राष्ट्रांच्या अधिवेशनातील तत्त्वांशी सुसंगत आहे.

## आदरयुक्त कार्यस्थळ: छळ, धमकावणे किंवा गैरवापर नाही

आपल्या इथे प्रत्येकाने छळ, धमकावणे किंवा गैरवापरापासून मुक्त वातावरणात काम केले पाहिजे. कोणतीही अवांछित, शारीरिक किंवा शाब्दिक नसलेली कृती – ती प्रत्यक्ष, ऑनलाइन किंवा इतर कोणत्याही माध्यमातून असो – पूर्णपणे अस्वीकार्य आहे.

अशा वर्तनामुळे केवळ व्यक्तीला नाही, तर संपूर्ण कार्यसंस्कृतीला हानी पोहोचते आणि नकारात्मक वातावरण तयार होते. त्यामुळे अशा कोणत्याही प्रकारच्या वागणुकीस आम्ही कोणत्याही परिस्थितीत सहन करत नाही.

## विविधता, समता आणि समावेशा यांद्वारे अधिक मजबूत

विविधता आणि समावेशकता हे आमच्या यशाचे मुख्य आधार आहेत. वेगवेगळे दृष्टिकोन नव्या कल्पनांना जन्म देतात, नावीन्याला चालना देतात आणि एकत्र काम करताना अधिक चांगले परिणाम मिळवण्यास मदत करतात.

आम्हाला विविधतेच्या सनदेसोबत असण्याचा अभिमान आहे आणि आम्ही अबोध पक्षपात कमी करण्यासाठी कटिबद्ध आहोत. आमचे उद्दिष्ट असे कार्यसंस्कृती तयार करणे आहे, जिथे प्रत्येकाला महत्त्वाचे वाटेल, आदर मिळेल आणि तो आपले सर्वोत्तम योगदान देऊ शकेल

## जबाबदार मूल्य साखळी

जबाबदारी केवळ आपल्या मर्यादित कामापुरती नसते. आपल्या मूल्य साखळीतील प्रत्येक व्यक्तीने मानवाधिकार, निष्पक्षता आणि आदर या तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे. सेम्पेरिट समूहाचे पुरवठादार धोरण हे नैतिक वर्तन, कामाच्या योग्य अटी आणि आंतरराष्ट्रीय कामगार मानकांचे पालन याबाबत आमच्या स्पष्ट अपेक्षा मांडते

### अधिक जाणून घ्या

मानवाधिकार आणि आधुनिक गुलामगिरीसंबंधी विधान

समूह पुरवठादार धोरण

लोक धोरण

विविधतेची सनद

सेम्पेरिट वार्षिक अहवाल - शाश्वतता विधान

# पर्यावरण संरक्षण, आरोग्य आणि सुरक्षितता

दररोज, आम्ही आमचा व्यवसाय असा वाढवण्याचा प्रयत्न करतो की तो सुरक्षित, शाश्वत आणि एकमेकांशी, समाजाशी आणि पर्यावरणाशी आदराने वागणारा असावा – आमच्या मूल्यांनुसार, आदर्शांनुसार आणि तत्त्वांनुसार. याचा अर्थ असा की आमची उत्पादने आणि कामकाज सर्व लागू पर्यावरणीय कायदे आणि मानकांचे पालन करतात, याची आम्ही नेहमी खात्री करतो आणि जबाबदारीने कृती करतो. हीच मानके आम्ही आमच्या पुरवठा-दारांना आणि इतर व्यावसायिक भागीदारांनाही लागू करतो. आम्ही त्यांच्याकडूनही पर्या-वरणीय कायद्यांचे पालन करण्याची, आमच्या अंतर्गत मानकांशी सुसंगत राहण्याची आणि शाश्वतता, सुरक्षितता व गुणवत्ता यासाठी वचनबद्ध राहण्याची अपेक्षा करतो.

## पर्यावरणाचे संरक्षण करणे

आम्ही नेहमी काम करण्याचे अधिक चांगले, सुरक्षित आणि शाश्वत मार्ग शोधत राहतो. हवा, पाणी आणि मातीचे प्रदूषण टाळण्यासाठी ऊर्जा, कच्चा माल आणि इतर स्रोतांचा वापर अधिक प्रभावीपणे कसा करता येईल, यावर आम्ही सातत्याने सुधारणा करतो. आपण जेव्हा सुविधा उभारतो, चालवतो, त्यात बदल करतो किंवा त्यांचा विस्तार करतो, तेव्हाही हीच काळजी घेतो. कचरा कमी करणे, पर्यावरणावरचा परिणाम कमी करणे आणि सर्वोत्तम तंत्रज्ञान व पद्धती वापरून कार्यक्षमतेने काम करणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे.


## व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्य

आमचे आरोग्य, सुरक्षा, पर्यावरण आणि गुणवत्ता धोरण हे कर्मचाऱ्यांच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक आरोग्याच्या सुधारणा यावर लक्ष केंद्रित करते. सेम्पेरिटमध्ये सुरक्षितता ही केवळ एक नियमावली नाही, तर ती आमची मानसिकता आहे. प्रत्येक कर्मचारी दिवसाच्या शेवटी सुरक्षित आणि निरोगी अवस्थेत घरी परतावा, हीच आमची अपेक्षा आहे. आम्ही संभाव्य धोके ओळखतो, त्यांना कमी करण्यासाठी उपाययोजना करतो आणि अपघात टाळण्यासाठी एकत्र काम करतो. "शून्य अपघात" ही आमची संस्कृती आहे, आणि ती प्रत्यक्षात आणण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील असतो. आम्ही नियमित प्रशिक्षण देतो, योग्य उपकरणे उपलब्ध करून देतो आणि आमच्या कामकाजाच्या पद्धती अधिक सुरक्षित कशा होतील याचे पुनरावलोकन करत राहतो

## पर्यावरणीय सुरक्षितता

आम्ही खात्री करतो की आमची उत्पादने आणि प्रक्रिया पर्यावरणीय, रासायनिक सुरक्षितता आणि कामाच्या ठिकाणच्या सुरक्षिततेसाठी लागू असलेल्या सर्व उच्च मानकांची पूर्तता करतात. सेम्पेरिट REACH यांसारख्या साहित्यासंबंधी नियमनांचे पालन करते, जेणेकरून सर्व साहित्य सुरक्षितपणे वापरले आणि हाताळले जाईल. आम्ही ग्राहक, पुरवठादार आणि नियामक संस्थांशी जवळून समन्वय साधतो, जेणेकरून सर्व कायदेशीर आणि अंतर्गत आवश्यकता पूर्ण होतील. आम्ही नेहमीच रसायने आणि घातक पदार्थ सुरक्षितपणे हाताळतो आणि साठवतो, जेणेकरून पर्यावरण आणि स्थानिक समुदायांवर होणारा परिणाम कमी करता येईल आणि अपघात किंवा आपत्कालीन परिस्थिती टाळता येतील.

**अधिक जाणून घ्या** सेम्पेरिट आरोग्य, सुरक्षितता, पर्यावरण आणि गुणवत्ता धोरण



## याचा तुमच्यासाठी काय अर्थ होतो?

- जबाबदारीने वागा: सुरक्षितता आणि पर्यावरणीय नियमांचे पालन करा आणि तुम्हाला धोका आढळल्यास व्यक्त व्हा.
- स्रोतांचा सुज्ञपणे वापर करा: ऊर्जा आणि साहित्य वाचवा व कचरा कमी करण्यात मदत करा.
- सुरक्षितपणे काम करा: सुरक्षितता प्रक्रियांचे पालन करून आणि साहित्य व रसायने काळजीपूर्वक हाताळून स्वतःचे आणि इतरांचे संरक्षण करा.
- आरोग्याला समर्थन द्या: कामाच्या ठिकाणी आदरयुक्त, निरोगी आणि आश्वासक वातावरण निर्माण करा.

**मदत हवी आहे का?**

HSEQ विभागाशी संपर्क साधा (HSE.Reporting@semperitgroup.com) अधिक माहितीसाठी, reach@semperitgroup.com वर संपर्क साधा.

# एकमेकांचे आणि समाजाचे संरक्षण करा

आम्ही पर्यावरणाचे रक्षण करणारे आणि स्थानिक समुदायांना मदत करणारे शाश्वत उपाय शोधत राहतो.



**ENVIRONMENT (E) – पर्यावरण**

आम्ही हवामान रक्षण आणि पर्यावरण उपक्रमांमध्ये सुधारणा करत राहतो.



**SOCIAL (S) – सामाजिक**

आम्ही सुरक्षित आणि निरोगी कामाचे वातावरण, समावेश आणि मानवी हक्कांचा सन्मान करतो.



**GOVERNANCE (G) – प्रशासन**

आम्ही व्यावसायिक प्रामाणिकपणा आणि शाश्वत पुरवठा साखळीचे नियम पाळतो.

## E... पर्यावरण (Environment)

आम्ही पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आणि प्राथमिक स्रोतांचा वापर कमी करण्यासाठी नेहमी काळजी घेतो. ऊर्जा आणि उत्सर्जन कमी करतो, कचरा नीट हाताळतो आणि जैवविविधतेला धोका होणार नाही याची काळजी घेतो.
आम्ही वर्तुळाकार विचारसरणी स्वीकारतो – म्हणजेच शक्य तिथे पुनर्वापरित किंवा नैसर्गिक साहित्य वापरतो, स्रोतांचा जपून वापर करतो आणि कचरा कमी करतो.

जुने साहित्य आणि संपलेली उत्पादने पुन्हा वापरून उत्पादन प्रक्रियेत सामील करतो.
नवीकरणयोग्य ऊर्जा वापरून आणि ऊर्जा कार्यक्षमतेत वाढ करून हरितगृह वायू उत्सर्जन कमी करतो.

## S... सामाजिक जबाबदारी आणि समावेश (Social responsibility and inclusion)

आम्ही वाढती असमानता आणि लोकसंख्येतील बदल यासारखी सामाजिक आव्हाने ओळखतो.
कर्मचाऱ्यांमध्ये विविधता, समानता आणि समावेश वाढवण्यासाठी आम्ही ठोस पावले उचलतो.
लिंगसंतुलित टीम तयार करणे आणि वेतनातील तफावत कमी करणे हे आमचे उद्दिष्ट आहे.
सर्व साइटवर न्याय्य आणि समान वेतनासाठी आम्ही काम करतो.

विविधता, समावेश, आरोग्य, सुरक्षितता आणि मानवी हक्क हे आमच्या कामकाजाचा भाग आहेत.
हे तत्व लोक धोरण आणि विविधतेच्या सनदेमुळे आमच्या संस्कृतीत रुजले आहेत.

## G... प्रशासन आणि जबाबदारी (Strong governance across the value chain)

आम्ही आमच्या मूल्य साखळीमध्ये मजबूत प्रशासन आणि जबाबदार व्यवसाय वर्तनावर भर देतो.
मानवी हक्कांचे रक्षण करतो, कायदे आणि नैतिक नियम पाळतो.

भ्रष्टाचार आणि लाचखोरी टाळतो, पुरवठा साखळीत पारदर्शकता आणि शाश्वतता वाढवतो.
ही वचनबद्धता आमच्या कामाच्या पलीकडेही जाते – आम्ही पुरवठादार आणि भागीदारांशी जवळून काम करतो, जेणेकरून तेही हेच मानके पाळतील आणि नकारात्मक परिणाम टाळतील.



### अधिक जाणून घ्या

लोक धोरण

विविधतेची सनद

मानवाधिकार आणि आधुनिक गुलामगिरीसंबंधी विधान

सेम्पेरिट वार्षिक अहवाल—शाश्वतता विधान

शाश्वतता | समूह | सेम्पेरिट

# 04 आम्ही जे महत्त्वाचे आहे ते सुरक्षित करतो



कंपनीचा डेटा, वैयक्तिक माहिती आणि भौतिक मालमत्ता सुरक्षित ठेवणे हे प्रत्येक कर्मचाऱ्याचे कर्तव्य आहे.

माहिती आपल्याला एकमेकांशी जोडते, सहकार्य सुलभ करते आणि योग्य निर्णय घेण्यास मदत करते. म्हणूनच माहिती अत्यंत काळजीपूर्वक हाताळली जाणे आवश्यक आहे. उत्पादन, त्याचे तपशील, वैयक्तिक डेटा किंवा संवेदनशील कंपनी माहिती – हे सर्व अनधिकृत प्रवेश आणि गैरवापरापासून सुरक्षित ठेवणे गरजेचे आहे.

आम्ही माहिती फक्त आवश्यक तेव्हाच वापरतो आणि ती नेहमी सुरक्षित व जबाबदारीने शेअर करतो. डिजिटल साधने आणि तंत्रज्ञान वापरताना आम्ही विचारपूर्वक पावले उचलतो आणि डेटा संरक्षणासोबत नावीन्य टिकवतो.

कंपनीच्या मालमत्तेचे रक्षण करणे, स्रोतांचा गैरवापर टाळणे, अचूक लेखा व नोंदी ठेवणे आणि परवानग्या योग्य प्रकारे हाताळणे – हे सर्व नैतिक आणि पारदर्शक व्यवसायासाठी आमची वचनबद्धता दर्शवतात.

**“माहिती अत्यंत काळजीपूर्वक हाताळली जाणे आवश्यक आहे”**

# संवेदनशील माहिती

आम्ही आमची संवेदनशील माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी सर्व आवश्यक पावले उचलतो. यामध्ये उत्पादन विकास, तांत्रिक माहिती, तंत्रज्ञान, बौद्धिक संपदा, आर्थिक तपशील, व्यवसाय धोरणे, ग्राहक माहिती, व्यापार गुपिते, अंतर्गत संवाद आणि इतर संवेदनशील माहिती यांचे संरक्षण समाविष्ट आहे – जी जर उघड झाली, हरवली किंवा गैरवापर झाली, तर सेम्पेरिट किंवा संबंधित व्यक्तींना हानी होऊ शकते. ही माहिती फक्त अधिकृत व्यक्तींनीच पाहावी आणि ती केवळ कायदेशीर व्यावसायिक कारणांसाठीच वापरली आणि शेअर केली पाहिजे. ही माहिती सेम्पेरिटच्या बाहेर, असुरक्षित उपकरणांवर किंवा असुरक्षित चॅनलद्वारे कधीही शेअर करू नये किंवा तिची चर्चा करू नये.

जर कोणी ही माहिती जबाबदारीने हाताळण्यात अपयशी ठरला, तर त्याच्यावर शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते आणि त्याचे कायदेशीर परिणामही भोगावे लागू शकतात.

## अंतर्गत नियम

आमच्या कामामधून आम्हाला मिळालेली काही माहिती भांडवल बाजार कायद्यानुसार "अंतर्गत माहिती" मानली जाऊ शकते. यामध्ये, उदाहरणार्थ, गोपनीय व्यवसाय योजना किंवा व्यापार गुपिते, आर्थिक परिणाम, नवीन उत्पादन लाँच किंवा अद्याप जाहीर न झालेले व्यवसाय सौदे यांचा समावेश असू शकतो.

पुढील कृती करण्यास सक्त मनाई आहे:

- अंतर्गत माहिती वापरून सेम्पेरिट समूहाचे (किंवा इतर कोणत्याही कंपनीचे) शेअर, बाँड अथवा इतर वित्तीय संलेख यांची खरेदी किंवा विक्री करणे
- एखाद्या व्यक्तीला त्या माहितीच्या आधारावर खरेदी किंवा विक्री करण्यास सांगणे
- ती माहिती जाणून घेण्याची परवानगी नसलेल्या कोणत्याही व्यक्तीसोबत ती माहिती शेअर करणे
- यांपैकी कोणतीही गोष्ट करणे हे कायद्याचे आणि सेम्पेरिट समूहाच्या नैतिक मानकांचे गंभीर उल्लंघन आहे.

## कृत्रिम बुद्धिमत्ता

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) हे एक प्रभावी साधन आहे, जे संस्थेतील उत्पादकता, निर्णय क्षमता आणि नावीन्य वाढवू शकते. आम्ही AI जबाबदारीने वापरतो आणि केवळ मान्यताप्राप्त टूल्सवरच विसंबतो.

AI वापरताना, संबंधित देशांचे कायदे पाळणे आवश्यक आहे आणि वापर आमच्या आचारसंहितेशी सुसंगत असावा. मानवी नियंत्रणाशिवाय AI वापरू नये. सार्वजनिक AI प्लॅटफॉर्मवर संवेदनशील किंवा वैयक्तिक माहिती कधीही टाकू नये. ही मार्गदर्शक तत्त्वे डेटा गोपनीयता राखण्यास, नियमांचे पालन सुनिश्चित करण्यास आणि डिजिटल युगात सचोटी टिकवण्यास मदत करतात.अधिक जाणून घ्या.

### अधिक जाणून घ्या

डेटा संरक्षण मार्गदर्शक तत्त्वे

अंतिम वापरकर्ता मार्गदर्शक तत्त्वे

मोबाइल डिव्हाइस मार्गदर्शक तत्त्वे

पुरवठादाराच्या आवश्यकतांसंबंधी मार्गदर्शक तत्त्वे

दस्तऐवजीकरण केलेल्या माहितीसंबंधी मार्गदर्शक तत्त्व

AI वापर मार्गदर्शक तत्त्वे

जारीकर्ता पालन निर्देश


## डेटा संरक्षण आणि गोपनीयता

कठोर कायदे आणि नियमांचे पालन करून वैयक्तिक डेटाचे संरक्षण केले जाते. डेटा हाताळताना आपण नेहमी काळजी घेतो आणि तो केवळ कामासाठी आवश्यक असेल, तेव्हाच वापरतो. अनधिकृत व्यक्तींशी तो शेअर होणार नाही, याची खात्री करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

आपल्या रोजच्या कामात किंवा नवीन प्रक्रिया आणि विकास करताना, वैयक्तिक डेटाचे संरक्षण करणे आवश्यक आहे. आम्ही कंपनीच्या उपकरणांवरील खाजगी माहिती योग्य प्रकारे लेबल करतो, जसे आमच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये स्पष्ट केले आहे.

## सायबर सुरक्षा

आमचे दैनंदिन कामकाज IT सिस्टीम्स आणि त्यांच्याद्वारे हाताळल्या जाणाऱ्या डेटावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. त्यामुळे आम्ही आमच्या IT उपाययोजनांची भेद्यता नियमितपणे तपासतो आणि तंत्रज्ञान व प्रक्रिया सतत सुधारून लवचिकता टिकवतो. यामुळे आमच्या डिजिटल पायाभूत सुविधांची सुरक्षितता आणि उपलब्धता कायम राहते. व्यापार गुपिते आणि संवेदनशील माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी आम्ही अतिरिक्त तांत्रिक आणि संघटनात्मक उपाययोजना राबवतो. यामुळे माहिती गळती किंवा नुकसान होण्याचा धोका कमी होतो आणि कंपनीवर किंवा इतर संबंधित घटकांवर नकारात्मक परिणाम होण्यापासून बचाव होतो.



## लक्षात ठेवा...

- बाहेरील व्यक्तींसोबत कोणतीही माहिती शेअर करू नका किंवा कोणाच्याही खाजगी फायद्यासाठी माहितीचा गैरवापर करू नका.
- तुमचा रोजगार संपल्यानंतरदेखील गोपनीय डेटाचे संरक्षण करा.
- प्रवास करताना किंवा रिमोट पद्धतीने काम करतानादेखील डेटाचे संरक्षण करा आणि तंत्रज्ञान सुरक्षितपणे वापरा.
- AI जबाबदारीने वापरा आणि कोणत्याही अंतर्गत किंवा बाह्य वापरापूर्वी नेहमी निर्मिती अथवा आशय तपासल्याची व तो योग्य प्रकारे चिन्हांकित केल्याची खात्री करा.
- माहितीचा प्रत्यक्ष किंवा संशयित गैरवापर, सायबर अपघात किंवा डेटा भंग यांची SPOC तिकिटाद्वारे अथवा data.privacy@semperitgroup.com किंवा cybersecurity@semperitgroup.com वर ईमेल करून तात्काळ तक्रार करा.

**मदत हवी आहे का?**

समूह पालन विभाग (compliance@semperitgroup.com), तुमचे स्थानिक डेटा संरक्षण समन्वयक किंवा मुख्य माहिती सुरक्षा अधिकारी अथवा cybersecurity@semperitgroup.com यांच्याशी संपर्क साधा.



## लक्षात ठेवा...

- पोस्ट करण्यापूर्वी किंवा शेअर करण्यापूर्वी विचार करा.
- अंतर्गत, गोपनीय किंवा सार्वजनिक नसलेली माहिती कधीही प्रकाशित करू नका.
- तुमच्या ऑनलाइन क्रियाकलापांमध्ये आदर बाळगा.
- तुमच्या संवादाच्या सेम्पेरिटवर आणि संपूर्ण बाजारपेठेवर होणाऱ्या संभाव्य परिणामाबाबत सावधगिरी बाळगा.

## असे झाल्यास काय होईल...

- काय शेअर करता केले जाऊ शकते किंवा बाहेरून येणारा प्रश्न कसा हाताळावा याबद्दल तुम्हाला खात्री नसल्यास, प्रतिसाद देण्यापूर्वी groupcom@semperitgroup.com वर संपर्क साधा.
- ज्यासाठी कंपनीकडून अधिकृत उत्तर आवश्यक आहे असा प्रश्न किंवा पोस्ट तुम्हाला दिसल्यास, थेट उत्तर देऊ नका – त्याऐवजी, तो समूह संवाद आणि भांडवल बाजार येथे पाठवा, जेणेकरून ते योग्य प्रतिसाद देऊ शकतील.

**मदत हवी आहे का?**

समूह संवाद आणि भांडवल बाजार यांच्याशी groupcom@semperitgroup.com वर संपर्क साधा.

# संवाद

## जबाबदारीने संवाद साधणे

आपण सेम्पेरिटबद्दल सार्वजनिकपणे जे काही बोलतो – ते मीटिंगमध्ये असो, मुलाखतीत किंवा सोशल मीडियावर – त्याचा थेट परिणाम कंपनीच्या प्रतिमेवर होऊ शकतो. आपण वैयक्तिक मत मांडत असलो तरी, इतरांना आपण कंपनीचे प्रतिनिधी आहोत असे वाटू शकते.

म्हणूनच, काहीही बोलण्यापूर्वी किंवा पोस्ट करण्यापूर्वी थांबून विचार करणे आवश्यक आहे. जर विषय संवेदनशील असेल किंवा सेम्पेरिटच्या प्रतिष्ठेवर किंवा बाजारातील स्थितीवर परिणाम करू शकतो असे वाटत असेल, तर आपण आधी समूह संवाद आणि भांडवल बाजार विभागांशी संपर्क साधला पाहिजे.

सेम्पेरिटच्या वतीने केवळ अधिकृत प्रवक्तेच बोलू शकतात आणि तेही फक्त आधीच सार्वजनिक केलेली माहितीच शेअर करू शकतात. यामुळे कंपनीची विश्वासार्हता टिकते आणि कोणताही गैरसमज टाळता येतो.

## सोशल मीडियाचा सुज्ञपणे वापर

सोशल मीडिया हे आजच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे आणि आम्ही प्रत्येकाच्या वापराच्या हक्काचा सन्मान करतो. मात्र, वैयक्तिक खात्यांवरील पोस्ट्सदेखील सेम्पेरिटच्या प्रतिमेवर परिणाम करू शकतात, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. म्हणूनच, आम्ही सोशल मीडियावर संवाद साधताना नेहमीच आमच्या मूल्यांशी आणि धोरणांशी सुसंगत, आदरयुक्त आणि व्यावसायिक भाषा वापरतो. आम्ही राजकीय, धार्मिक किंवा इतर संवेदनशील विषयांवर भाष्य करण्याचे टाळतो, कारण त्यामुळे गैरसमज निर्माण होऊ शकतात किंवा कंपनीच्या प्रतिष्ठेला धक्का बसू शकतो. तसेच, आम्ही कधीही अंतर्गत किंवा गोपनीय माहिती – जसे की कंपनीचा डेटा, प्रतिमा, व्हिडिओ किंवा सार्वजनिक न केलेली कोणतीही माहिती – ऑनलाइन शेअर करत नाही. ही जबाबदारी जपणे म्हणजेच सेम्पेरिटच्या विश्वासार्हतेचे आणि सुरक्षिततेचे रक्षण करणे.

## ऑनलाइन आदर आणि जबाबदारी

सोशल मीडिया वापरताना, आम्ही कामाच्या ठिकाणी लागू असलेल्या आदर, जबाबदारी आणि व्यावसायिकतेच्या तत्त्वांचे पालन करतो. आम्ही कधीही ऑनलाइन प्लॅटफॉर्मचा वापर इतरांना त्रास देण्यासाठी, भेदभाव करण्यासाठी किंवा धमकावण्यासाठी करत नाही.

आम्ही कॉपीराइट आणि गोपनीयतेच्या कायद्यांचा आदर करतो – केवळ आमच्याकडे अधिकृत परवानगी असेल, तरच कोणताही आशय शेअर करतो.

सेम्पेरिटचा लोगो किंवा ब्रँडसंबंधी साहित्य खाजगी किंवा व्यावसायिक कारणांसाठी वापरण्यापूर्वी, समूह संवाद आणि भांडवल बाजार विभागांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

अंतर्गत समस्या, तक्रारी किंवा मतभेद यांबाबत कधीही सार्वजनिकपणे चर्चा करू नये. त्याऐवजी, आम्ही आमच्या टीम लीडर, पालन टीम किंवा SemperLine हॉटलाइनद्वारे योग्य मार्गाने ही माहिती शेअर करतो.

ही तत्त्वे केवळ कंपनीच्या प्रतिष्ठेसाठी नव्हे, तर एकमेकांप्रती आदर राखण्यासाठी आणि सुरक्षित डिजिटल वातावरण टिकवण्यासाठीही महत्त्वाची आहेत.

**“आम्ही ऑनलाइन शेअर करत असलेल्या गोष्टींची जबाबदारी घेतो आणि नेहमीच आदराने सोशल मीडिया वापरतो - सहकाऱ्यांना किंवा इतर कोणालाही धमकावण्यासाठी, त्रास देण्यासाठी अथवा भेदभाव करण्यासाठी कधीही वापरत नाही.”**

### अधिक जाणून घ्या

अंतर्गत आणि बाह्य संवाद

सोशल मीडिया मार्गदर्शक तत्त्व

दस्तऐवजीकरण केलेल्या माहितीसंबंधी मार्गदर्शक तत्त्वे

# अंतर्गत नियंत्रण नियम

## अचूक लेखापालन आणि रेकॉर्ड

आम्ही अपेक्षा करतो की सर्व कर्मचारी आमच्या व्यवसायाची आणि आर्थिक स्थितीची खरी प्रतिमा दर्शवणारे लेखापालन आणि रेकॉर्ड प्रामाणिकपणे राखतील. प्रत्येक कर्मचारी व्यवहार अचूकपणे, सचोटीने आणि काळजीपूर्वक नोंदवण्यासाठी जबाबदार आहे. आम्ही लेखा, आर्थिक अहवाल आणि कर आकारणीसंबंधी सर्व कायदेशीर जबाबदाऱ्यांचे पूर्ण पालन करतो. सर्व रेकॉर्ड हे संबंधित व्यवहारांचे आणि कृतींचे खरे आणि अचूक प्रतिबिंब असावे, याला आम्ही सर्वोच्च प्राधान्य देतो. हेच पारदर्शक आणि विश्वासार्ह व्यवसायाचे मूलभूत तत्त्व आहे.

## चार डोळ्यांचे तत्त्व

सेम्पेरिटमध्ये व्यवहाराची अचूकता आणि रेकॉर्डिंग सुनिश्चित करण्यासाठी चार डोळ्यांचे तत्त्व (Four-Eyes Principle) अत्यंत महत्वाचे आहे. आपण कंपनीच्या वतीने जे कोणतेही व्यवसायिक उपक्रम किंवा व्यवहार करतो – ते अंतर्गत असोत किंवा बाह्य – त्यामध्ये हे तत्त्व पाळणे ही आपली जबाबदारी आहे.
कोणताही दस्तऐवज जो सेम्पेरिट समूहाच्या वतीने बंधनकारक ठरतो, त्यावर किमान दोन अधिकृत प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक आहे. हे पारदर्शकता, जबाबदारी आणि विश्वासार्हतेचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक आहे.

## अधिकाराच्या मर्यादा

आम्ही सेम्पेरिटमध्ये अधिकारांच्या मर्यादांचे काटेकोर पालन करतो. या मर्यादा प्रत्येक व्यवसाय निर्णयासाठी कोणत्या स्तरावर अधिकृतता आवश्यक आहे, हे स्पष्टपणे परिभाषित करतात.
या अधिकार मर्यादा सर्व कर्मचारी आणि प्रतिनिधींना लागू होतात आणि त्या प्रत्येक घटकाच्या व्यवस्थापन नियमांमध्ये समाविष्ट असतात. यामुळे निर्णय प्रक्रिया पारदर्शक, जबाबदार आणि नियमानुसार राहते.

## व्यवस्थापनाचे नियम

प्रत्येक संस्थेचे महाव्यवस्थापक हे सुनिश्चित करतात की त्यांच्या संस्थेसाठी विशिष्ट व्यवस्थापन नियम अस्तित्वात असावेत. या नियमांमध्ये बाह्य प्रतिनिधित्वाचे अधिकार — जसे की करारांवर स्वाक्षरी करण्याचा अधिकार — स्पष्टपणे नमूद केलेले असणे आवश्यक आहे. हे अधिकार संबंधित समूहाच्या मार्गदर्शक तत्त्वांशी पूर्णपणे सुसंगत असावेत, जेणेकरून निर्णयप्रक्रिया पारदर्शक, जबाबदार आणि नियमबद्ध राहील.

## अंतर्गत नियंत्रण प्रणाली

प्रत्येक सेम्पेरिट घटकासाठी, त्याच्या आकार, प्रदेश किंवा व्यवसाय विभाग काहीही असो, अंतर्गत नियंत्रण प्रणाली असते. सर्व कर्मचाऱ्यांनी सर्व प्रक्रियांमध्ये ही नियंत्रण प्रणाली पाळली पाहिजे. सर्वसाधारण देखरेख ही अंतर्गत लेखापरीक्षण विभाग करत असतो, आणि अंमलबजावणी व पालनाची जबाबदारी सेम्पेरिट संस्थेच्या व्यवस्थापनाकडे असते. अंतर्गत नियमांचे उल्लंघन झाल्यास, उपलब्ध संवाद माध्यमांद्वारे तक्रार करणे आवश्यक असते.

## आपल्या स्रोतांचे आणि मालमत्तेचे संरक्षण करणे

सेम्पेरिटच्या स्रोतांचे, मालमत्तेचे आणि संपदेचे रक्षण करणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.
यामध्ये भौतिक मालमत्ता, उत्पादन साखळीतील साहित्य, उपकरणे, कार्यालयीन वस्तू, आर्थिक साधने, बौद्धिक संपदा, ब्रँड आणि गोपनीय माहिती यांचा समावेश होतो. आपण ही मालमत्ता नेहमी जबाबदारीने आणि फक्त वैध व्यावसायिक कारणांसाठी वापरली पाहिजे. अनधिकृत वापर, गैरवापर किंवा नुकसान करण्यास सक्त मनाई आहे. चोरी, हानी किंवा गैरवापर टाळण्यासाठी आपण नेहमी सतर्क राहिले पाहिजे.
व्यावसायिक भागीदारांची किंवा इतर कोणाचीही मालमत्ता हाताळताना देखील हीच तत्त्वे लागू होतात.

## फसवणूक

सेम्पेरिटमध्ये कोणत्याही प्रकारची फसवणूक सहन केली जात नाही. यामध्ये सहेतुक फसवणूक, हातचलाखी किंवा वैयक्तिक, आर्थिक किंवा इतर बेकायदेशीर फायद्यासाठी केलेला विश्वासघात यांचा समावेश होतो.
फसवणुकीसंदर्भात कोणताही संशय किंवा पुरावा आढळल्यास, तो तात्काळ आपल्या टीम लीडकडे किंवा SemperLine हॉटलाइनवर नोंदवणे सर्व कर्मचाऱ्यांसाठी बंधनकारक आहे.

### अधिक जाणून घ्या

फसवणूक शोधणे आणि तक्रार करणे

अधिकाराच्या मर्यादा

व्यवस्थापनाचे नियम

पेमेंट सुरक्षा



## लक्षात ठेवा...

- चार डोळ्यांचे तत्व नेहमी लागू करा – कोणतीही पेमेंट फक्त एका व्यक्तीद्वारे अधिकृत केली जाऊ शकत नाहीत.
- तुम्ही पेमेंट करण्यासाठी किंवा दस्तऐवजांवर स्वाक्षरी करण्यासाठी अधिकृत आहात का हे तपासा.
- पेमेंटवर प्रक्रिया करताना, अचूकता आणि वैधता यांची पडताळणी करण्यासाठी नेहमी वेळ काढा. चुकीच्या किंवा अनधिकृत प्राप्तकर्त्याला निधी पाठवण्याचा धोका पत्करण्यापेक्षा व्यवहाराला उशीर करणे आणि अतिरिक्त पुनरावलोकन करणे अधिक चांगले असते.
- तुम्हाला सुरक्षा उपकरणे (इलेक्ट्रॉनिक टोकन, डोंगल, इ.) शेअर करण्याची सक्त मनाई आहे.

**मदत हवी आहे का?**
अंतर्गत लेखापरीक्षणाशी internal.controls@semperitgroup.com वर संपर्क साधा

**सेम्पेरिट एजी होल्डिंग**

**जनरल काउन्सेल**
फ्रांझ-मायकेल होहेनसिन
franz-michael.hohensinn@semperitgroup.com

**वरिष्ठ समूह पालन व्यवस्थापक**
सिमोना एच. बोसिजर
simona.h.bosiger@semperitgroup.com

**पालन विभाग**
compliance@semperitgroup.com

**मुख्य माहिती सुरक्षा अधिकारी**
ख्रिश्चन पॉप
christian.popp@semperitgroup.com

**अंतर्गत नियंत्रणे (फसवणूक)**
internal.controls@semperitgroup.com

**समूह कोषकक्ष (पेमेंटसंबंधी फसवणूक)**
GroupTreasury.Vienna@semperitgroup.com

**समूह संवाद आणि भांडवल बाजार**
groupcom@semperitgroup.com

**डेटा गोपनीयता**
data.privacy@semperitgroup.com

**पत्ता**
ॲम बेल्व्हडेअर 10
1100 व्हिएन्ना, ऑस्ट्रिया
www.semperitgroup.com

लोकांबद्दलचे सर्व संदर्भ लिंग तटस्थ आहेत.
अंतर्गत दस्ताऐवजांचे संदर्भ आणि त्यांच्या लिंक फक्त अंतर्गत भागधारकांसाठी उपलब्ध आहेत.
इंटेलिजंट संपादन तंत्रज्ञानांच्या मदतीने भाषेची गुणवत्ता वर्धित केली गेली.

सेम्पेरिट समूह म्हणजे सेम्पेरिट एजी होल्डिंग आणि त्यांच्या पूर्ण मालकीच्या सर्व उपकंपन्या.

© सेम्पेरिट एजी होल्डिंग

ही आचारसंहिता रिको समूहासह, सेम्पेरिट समूहाला लागू होते.

SEMPERIT

www.semperitgroup.com